रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ५३
www.ramprahar.com

◆ मंगळवार, ८ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कॅबचालकाकडून मध्यरात्री महिलेचा विनयभंग/३
चोरीस गेलेल्या स्वामी समर्थांच्या पादुका हस्तगत/५
दुलिप ट्रॉफी फायनलमध्ये ईशान किशनचे द्विशतक/८

### ग्रामीण भागातील एलपीजी सिलिंडर ग्राहकांना दिलासा

**नवी दिल्ली** : देशातील घरगुती एलपीजी ग्राहकांसाठी केंद्र सरकारने दिलासादायक निर्णय घेतला आहे.



आता ग्रामीण भागांतील एलपीजी ग्राहकांसाठीही २५ दिवसांचा समान सिलिंडर रिफिल बुकिंग कालावधी लागू करण्यात आला असल्याची घोषणा केंद्रीय पेट्रोलियम, नैसर्गिक वायू आणि पर्यटन राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी सोमवारी (दि. ७) केली. तेल विपणन कंपन्यांना या सुधारित नियमाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. फेब्रुवारी २०२६मध्ये मध्य पूर्व आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे सरकारने १२ मार्च रोजी तात्पुरत्या स्वरूपात मागणी व्यवस्थापन लागू केले होते. त्यानुसार शहरी भागातील ग्राहकांसाठी २५ दिवस, तर ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी ४५ दिवसांच्या अंतरानेच पुढील सिलिंडर बुक करण्याचा नियम करण्यात आला होता. तो आता सुधारण्यात आला आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत | जागतिक ग्लोबल फिनटेक फेस्टचे करणार उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी (दि. ८) मुंबई दौऱ्यावर येत असून त्यांच्या हस्ते ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६चे उद्घाटन होणार आहे. या जागतिक वित्तीय तंत्रज्ञान महोत्सवात सायंकाळी ५.४५ वाजता ते उपस्थितांना विशेष मार्गदर्शनही करणार आहेत.

मुंबईत ८ ते ११ सप्टेंबर या कालावधीत सातव्या ग्लोबल फिनटेक फेस्टचे आयोजन करण्यात आले आहे. वर्ष २०२०पासून सुरू झालेली ही परिषद आता एक अग्रगण्य आंतरराष्ट्रीय विचार-नेतृत्व व्यासपीठ म्हणून उदयास आली आहे. धोरणकर्ते, नियामक मंडळे, मध्यवर्ती बँकांचे प्रतिनिधी, वित्तीय संस्था, फिनटेक कंपन्या, तंत्रज्ञान क्षेत्रातील



दिग्गज, जागतिक गुंतवणूकदार आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांना हे व्यासपीठ एकत्र आणते.

'एजेंटिक एआय, टोकेनायझेशन, क्वांटम' ही यंदाच्या आयोजनाची मुख्य संकल्पना असूण डिजिटल पेमेंट आणि आर्थिक समावेशनामध्ये भारताचे जागतिक नेतृत्व अधिक दृढ करणे हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

## न्यू जेएनपीटीसह डब्ल्यूडीएफसीच्या तीन टप्प्यांचा राष्ट्रार्पण सोहळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी महाराष्ट्र दौऱ्यावर येण्यापूर्वी सकाळी गुजरातमधील वडोदरा येथे विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करणार आहेत. यावेळी ते पश्चिम विभागीय समर्पित मालवाहू कॉरिडॉर (डब्ल्यूडीएफसी) अंतर्गत ३२६ मार्ग किमी व्याप्तीच्या आणि २० हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून उभारलेल्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे राष्ट्रार्पण करतील. यात साणंद (उत्तर)-मकरपुरा, न्यू उंबरगाव-न्यू सफाळे आणि न्यू सफाळे-जेएनपीटी या टप्प्यांचा समावेश आहे.

जेएनपीटी येथील कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या प्रकल्पामुळे जेएनपीटीसोबतची थेट दळणवळणीय जोडणी उपलब्ध होणार आहे. परिणामी

### रेल्वेगाड्यांनाही दाखवणार हिरवा झेंडा

आयात-निर्यातीसंदर्भात होणारी मालवाहतूक जलद गतीने होण्यास मदत होईल. औद्योगिक केंद्र आणि बंदरांसोबतची दळणवळणीय जोडणी अधिक भक्कम होईल. रसद पुरवठा व्यवस्थापनासाठीचा खर्च कमी होईल आणि मुंबईतील रेल्वे व्यवस्थेवरचा ताण कमी होण्यासही मदत होणार आहे.

यावेळी पंतप्रधान न्यू साणंद (उत्तर), न्यू मकरपुरा, न्यू उंबरगाव आणि न्यू जेएनपीटी इथून निघणाऱ्या मालगाड्यांना हिरवा झेंडा दाखवून रवानाही करणार आहेत. या टप्प्यांचे राष्ट्रार्पण केल्यानंतर समर्पित मालवाहू कॉरिडॉरशी संलग्न संपूर्ण जाळे कार्यरत होईल. या व्यवस्थेमुळे बहुपर्यायी दळणवळणीय जोडणीत सुधारणा घडून येईल. वाहतुकीचा वेळ कमी होईल तसेच विविध प्रदेशांमध्ये वस्तुमालाची वाहतूक विनाअडथळा आणि सुलभतेने करणे शक्य होईल. परिणामी देशाच्या रसद पुरवठा व्यवस्थापनाच्या परिसंस्थेलाही अधिक बळकटी मिळेल.

न्यू जेएनपीटी परिसरात सकाळी १०.३० वा. होणाऱ्या या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून महाराष्ट्रासह देशाच्या मालवाहतूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी हा महत्त्वाचा दिवस आहे.

# मराठा समाजासाठी मोठे निर्णय

## राज्यातील विद्यार्थ्यांसह तरुणांना मिळणार फायदे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मराठा, कुणबी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थी व तरुणांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. शिक्षणातील सवलती, रखडलेला वसतिगृह निर्वाह भत्ता, परदेशी शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण अशा विविध बाबींशी संबंधित चार महत्त्वाचे शासन निर्णय आणि प्रशासकीय आदेश जारी करण्यात आले आहेत.

**मराठा विद्यार्थ्यांना ओबीसीप्रमाणे शैक्षणिक सवलती**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७पासून तंत्रशिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सवलती आणि सुविधांचा लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तंत्रशिक्षण संचालनालयाने संबंधित विभागीय



कार्यालये आणि विद्यापीठांना याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यामुळे शुल्क, शैक्षणिक योजना आणि इतर सुविधांचा लाभ पात्र विद्यार्थ्यांना मिळण्याचा मार्ग सुकर होणार आहे.

**वसतिगृह निर्वाह भत्त्यासाठी २०० कोटींचा निधी**

ईबीसी, ईडब्ल्यूएस आणि एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा रखडलेला वसतिगृह निर्वाह भत्ता देण्यासाठी सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना ही प्रलंबित रक्कम वितरित केली जाणार आहे. त्यामुळे वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या अडचणीतील विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे.

**परदेशी शिक्षणासाठी 'सारथी'च्या शिष्यवृत्तीत महत्त्वपूर्ण सुधारणा**

'सारथी'च्या परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. परदेशातील विद्यापीठांची शिक्षण फी थेट संबंधित संस्थेला देण्याची तरतूद करण्यात आली असून शिष्यवृत्तीवरील कमाल आर्थिक मर्यादाही हटवण्यात आली आहे. याशिवाय अतिरिक्त खर्चासाठी दरवर्षी १,५०० अमेरिकन डॉलर, तर ब्रिटनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १,१०० जीबीपी भत्त्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठांची निवड व गुणवत्तेचे निकष ठरवण्यासाठी क्यूएस क्रमवारीवर आधारित पद्धतीचा वापर केला जाणार आहे. (पान २ वर..)

### करंजा बंदराच्या विकासाला मिळणार चालना!

# १८० कोटींच्या निधीतून होणार विविध कामे

## मच्छीमारांचे हित आणि उरणकरांच्या सुविधांना प्राधान्य : आमदार महेश बालदी

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील करंजा परिसराच्या विकासाला आता मोठी चालना मिळणार आहे. येथील विविध विकासकामांसाठी तब्बल १८० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. या निधीतून करण्यात येणाऱ्या कामांचे नियोजन, प्राधान्यक्रम आणि अंमलबजावणी याबाबत करंजा सोसायटी येथे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून आणि प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

या बैठकीस मत्स्यपालन विभागाचे अधिकारी, करंजा सोसायटीचे पदाधिकारी तसेच



मोठ्या संख्येने मच्छीमार बांधव उपस्थित होते. यावेळी करंजा परिसराच्या विकासाच्या दृष्टीने प्रस्तावित असलेल्या विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

करंजा हा परिसर मोठ्या प्रमाणावर मच्छीमारी व्यवसायाशी जोडलेला असून येथील मच्छीमार बांधवांच्या दैनंदिन गरजा, व्यवसायाशी संबंधित अडचणी, उपलब्ध पायाभूत सुविधा आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन विकासकामांचे नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे केवळ पायाभूत सुविधांचा विकास न करता मच्छीमार बांधवांच्या व्यवसायाला आणि त्यांच्या दैनंदिन जीवनाला अधिक सुविधा मिळतील या दृष्टिकोनातून कामांना प्राधान्य दिले जाणार आहे.

बैठकीदरम्यान उपस्थित मच्छीमार बांधव आणि करंजा सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांकडून स्थानिक पातळीवरील विविध समस्या, मागण्या आणि सूचना जाणून घेण्यात आल्या. विकासकामे करताना स्थानिक नागरिकांच्या प्रत्यक्ष गरजा आणि अपेक्षा लक्षात घेणे आवश्यक असल्याचे आमदार महेश बालदी यांनी यावेळी स्पष्ट केले. (पान २ वर..)

## निवडक

### दिल्ली इमारत दुर्घटनेप्रकरणी मालक, पत्नी, मुलगा अटकेत

**नवी दिल्ली** : राजधानी दिल्लीतील सत्य निकेतन परिसरात विद्यार्थ्यांचे वसतिगृह म्हणून वापरली जाणारी इमारत कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. इमारतीचा मुख्य मालक हरिराम गुप्ता (८१) याला राजस्थानच्या भिवाडी येथून अटक केल्यानंतर त्याची पत्नी व नोंदणीकृत मालक उर्मिला गुप्ता (७५) आणि मुलगा व व्यवस्थापक महेश गुप्ता (५२) यांनाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या दुर्घटनेत पाच विद्यार्थ्यांसह एकूण सात जणांचा मृत्यू झाला असून अनेक गंभीर जखमी आहेत.

### भारतीय सैन्यदलासाठी विविध उपकरणांच्या खरेदीला मंजुरी

**नवी दिल्ली** : भारताच्या संरक्षण मंत्रालयाने तिन्ही सैन्य दलांसाठी तब्बल १.१० लाख कोटींच्या लष्करी उपकरणांच्या खरेदीला मंजुरी दिली आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. त्यामुळे सैन्यदलाला आणखी बळ मिळणार आहे.

## समरसता संकल्प अभियानांतर्गत पनवेलमध्ये कार्यक्रम; विद्यार्थ्यांचा गौरव

### संत रोहिदास महाराजांच्या कार्याला मान्यवरांकडून उजाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या वतीने संत रोहिदास महाराज यांच्या ६५०व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून समरसता संकल्प अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत पनवेल शहर मंडळातर्फे शहरातील रोहिदास वाडा येथील समाजमंदिरामध्ये विशेष कार्यक्रम झाला. भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून प्रसिद्ध कवी, गझलकार व समीक्षक रोहिदास पोटे यांनी उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक मनोज भुजबळ, सुमित झुंजारराव, नगरसेविका दर्शना भोईर, विलास मोहोकर, सारिका भगत, शिवदास कांबळे, सुलोचना कल्याणकर, सुरेखा मोहकर, रेणुका मोहोकर तसेच शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नावेकर, सपना पाटील, विजय मोहोकर, गणेश कडू, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, लक्ष्मण कल्याणकर, जगदीश उरणकर, प्रवीण मोहोकर, महेश राऊळ, चंद्रकांत मंजुळे, आतिश मोहोकर, समीप मोहोकर, समित म्हात्रे, विकास उरणकर, सचिन उरणकर, मिलिंद उरणकर, दिनेश भोस्कर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजातील बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी निबंध आणि चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद अखेर रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेत उद्धव ठाकरे सेनेला मोठा धक्का बसला आहे. विशाखा राऊत यांचे नगरसेवकपद रद्द केल्याची अधिकृत घोषणा महापौर रितू तावडे यांनी सोमवारी (दि.७) सभागृहाच्या बैठकीत केली.

विशाखा राऊत यांचे जात प्रमाणपत्र हे पडताळणी समितीकडून अवैध ठरवण्यात आले होते. त्यानंतर महापालिका प्रशासनाकडून राऊत यांचे पद रद्द करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. याबाबत आयुक्तांनी नगरविकास खात्याकडेही पत्र पाठवले. दरम्यान, महापालिकेच्या या प्रक्रियेला स्थगिती द्यावी ही मागणी करत राऊत यांनी हायकोर्टाचे दरवाजे ठोठावले होते, मात्र हायकोर्टाने त्यांची याचिका फेटाळल्याने राऊत यांचे नगरसेवकपद रद्द होणार हे निश्चित झाले होते.

## भरती परीक्षा सुधारणांसाठी उच्चस्तरीय टास्क फोर्स साधणार राज्यव्यापी संवाद

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उच्चस्तरीय टास्क फोर्स गठीत केला आहे. भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी टास्क फोर्स राज्याच्या सर्व सहा विभागांना प्रत्यक्ष भेट देणार आहे.

या भेटीदरम्यान विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच अन्य संबंधित हितधारकांशी थेट संवाद साधून त्यांच्या सूचना, अडचणी व अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत. नागरिक व संबंधित हितधारक आपल्या सूचना व अभिप्राय संबंधित विभागाच्या वरील ई-मेल पत्त्यावर पाठवू शकतात.

या विभागनिहाय संवादातून प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा टास्क फोर्सकडून अभ्यास करण्यात येणार आहे. त्याआधारे भरती परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध, परीक्षा सुरक्षेचे बळकटीकरण, प्रक्रियेतील पारदर्शकता व विश्वासार्हता वाढविणे तसेच परीक्षा व्यवस्था अधिक उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक सुधारणांबाबत शासनास शिफारशी सादर करण्यात येतील. भेटीची वेळ, सहभागाची प्रक्रिया तसेच इतर सविस्तर माहिती संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाकडून स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

## शाडू मातीच्या गणेशमूर्तींना वाढती पसंती

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवाकडे भाविकांचा कल



**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपल्याने भाविकांना बाप्पाच्या आगमनाचे वेध लागले आहेत. यंदा पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याकडे नागरिकांचा कल वाढताना दिसत असून शाडूच्या मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तींना विशेष पसंती मिळत आहे.

पनवेल परिसरातील विविध बाजारपेठांमध्ये सध्या लहान-मोठ्या आकारांच्या, सुबक आणि आकर्षक शाडू मातीच्या गणेशमूर्ती विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. पारंपरिक रूपातील गणरायासोबतच विविध कलात्मक आणि आकर्षक रूपांतील मूर्तीही भक्तांचे लक्ष वेधून घेत आहेत.

यंदाच्या गणेशोत्सवात भक्तीला पर्यावरण संवर्धनाची जोड देण्याचा प्रयत्न नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे बाप्पाही हवेत आणि पर्यावरणही जपायचे आहे, अशी भूमिका अनेक गणेशभक्त घेताना दिसत आहेत. शाडूच्या मातीच्या मूर्तींना मिळणारी वाढती पसंती हा त्याचाच सकारात्मक परिणाम मानला जात आहे.

पर्यावरणाचे रक्षण आणि जलप्रदूषण टाळण्यासाठी प्रशासनाकडूनही शाडू मातीच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. शाडूचा गणपती आणा, पर्यावरण वाचवा या संदेशातून नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली जात आहे.

गणरायाच्या स्वागताची सर्वत्र लगबग असून गणेशमूर्तींच्या खरेदीसाठी गर्दी वाढू लागली आहे. याशिवाय सजावटीचे साहित्य, पूजेचे साहित्य आणि इतर आवश्यक वस्तूंची खरेदीही सुरू झाली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आगामी दिवसांत बाजारपेठांमधील लगबग आणखी वाढणार आहे.

### धर्मवीर गड राज्य संरक्षित स्मारक घोषित

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराजांच्या अद्वितीय पराक्रमाची आणि बलिदानाची



साक्ष देणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्याच्या श्रीगोंदा तालुक्यातील 'धर्मवीर गड' (पेडगाव)बाबत राज्य सरकारने एक ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाने या गडाला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे.

भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी धर्मवीर गडाच्या जतन आणि संवर्धनासाठी राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. याआधी पाचपुते यांच्याच मागणीनुसार पेडगाव येथील या ऐतिहासिक 'बहादूरगडाचे' नामकरण 'धर्मवीर गड' असे अधिकृतपणे करण्यात आले होते. त्यानंतर आता हा गड राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झाल्यामुळे त्याचे जतन, संवर्धन आणि सुशोभीकरण करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



**पनवेल : भारतीय सेनेच्या अद्वितीय शौर्य, पराक्रम आणि अमर बलिदानाच्या गौरवशाली परंपरेला समर्पित राष्ट्रीय पुरस्कार समारंभ तथा अखिल भारतीय प्रतिभा महासंमेलन नुकतेच शिर्डी येथे झाले. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा नरेंद्र शिंदे यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत नारी शक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मुख्याध्यापिका शिंदे यांचे अभिनंदन केले. यावेळी संस्थेच सदस्य ॲड. राहुल घरत उपस्थित होते.**

# कुपोषित बालकांमधील टीबी तपासणीला मिळणार गती!

**मुंबई : प्रतिनिधी**

कुपोषित बालकांमध्ये क्षयरोगाचे (टीबी) वेळीच निदान होऊन त्यांना योग्य उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांनुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये (NRC) टीबी तपासणीची कार्यपद्धती अधिक बळकट करण्यात आली आहे. कुपोषणामागील एक महत्त्वाचा घटक असलेल्या बाल टीबीचे निदान, उपचार आणि प्रतिबंध यासाठी राज्यात विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.



मुख्यमंत्री सचिवालयाच्या २ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या निर्देशांनुसार आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात आरोग्य विभाग महिला आणि बालकांच्या आरोग्याची विविध उपक्रमाद्वारे काळजी घेत आहे. पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये दाखल होणाऱ्या बालकांची टीबी तपासणी, निदान व उपचारासाठी मानक कार्यपद्धती, प्रशिक्षण, निदान सुविधा आणि औषधांचा पुरवठा सुनिश्चित करण्यात आला आहे.

या कार्यपद्धतीनुसार बालकांची लक्षणे व टीबी रुग्णाच्या संपर्काचा इतिहास तपासला जातो. आवश्यकतेनुसार नमुना संकलन, सीबी-नॅट/ट्रूनॅट तपासणी आणि छातीचा एक्स-रे यांसारख्या निदान सुविधांशी बालकांना जोडण्यात आले आहे.

**जुलै २०२६ पर्यंत २,८३५ बालकांची टीबी तपासणी**

२०२१ ते जुलै २०२६ या कालावधीत पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये दाखल २९,८७५ बालकांपैकी २६,८५७ बालकांची टीबी तपासणी करण्यात आली आहे. म्हणजेच एकूण तपासणीचे प्रमाण ८९.९ टक्के आहे. २०२६ मध्ये जुलैपर्यंत दाखल ३,०१७ बालकांपैकी २,८३५ बालकांची तपासणी करण्यात आली असून, हे प्रमाण ९४ टक्के आहे. तपासणीचे प्रमाण सातत्याने उच्च राहिले असून, २०२२ मधील २३ रुग्णांवरून २०२५ मध्ये ७ आणि जुलै २०२६ पर्यंत ३ बालकांवर उपचार सुरू करण्यात आले आहेत. तपासणीचे प्रमाण उच्च राहतानाही निदान झालेल्या रुग्णांची संख्या कमी होत असल्याचे दिसून येते. संपर्क तपासणी व निक्षय नोंदींच्या आधारे त्याचे सातत्याने परीक्षण करण्यात येत आहे.

**बाल टीबी प्रतिबंधासाठी नवीन उपक्रम**

टीबीच्या संपर्कात आलेल्या मात्र लक्षणे नसलेल्या बालकांना टीबी प्रतिबंधात्मक उपचार (TPT) देण्यासाठी घरगुती व एनआरसी संपर्क तपासणी बळकट करण्यात आली आहे. तसेच, जटिल, औषध-प्रतिरोधक आणि निदानास आव्हानात्मक बालरुग्णांसाठी बाल टीबी उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे. पोषण पुनर्वसन केंद्रांमधील टीबी तपासणी व निदानाची माहिती निक्षय पोर्टलशी जोडण्याचे काम सुरू असून, रुग्णांची नोंदणी, उपचारांचा मागोवा आणि परिणामांचे परीक्षण अधिक प्रभावी होणार आहे. टीबी निदान झालेल्या बालकांना निक्षय पोषण योजना व निक्षय मित्र उपक्रमांतर्गत पोषण सहाय्याशी जोडण्यात येत आहे.

जास्त रुग्ण असलेल्या पोषण पुनर्वसन केंद्रांजवळ ट्रूनॅट/सीबी-नॅट यंत्रणा उपलब्ध करून देण्याचा विस्तार, संपर्क तपासणी, क्षयरोगावरील प्रशिक्षण आणि पालकांचे समुपदेशन यावरही भर देण्यात येत आहे. यामुळे निदानासाठी लागणारा वेळ कमी होऊन उपचारांमध्ये खंड पडण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत होणार आहे.

राज्यातील सर्व पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये (NRC) टीबी तपासणीचे प्रमाण ९० टक्यांपेक्षा अधिक राखणे, उर्वरित बालकांची तपासणी पूर्ण करणे, पात्र बालसंपर्कांना प्रतिबंधात्मक उपचार देणे आणि आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग तसेच राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम यांच्यातील समन्वय अधिक बळकट करणे, या उपाययोजनांवर भर देण्यात येणार आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यांची पाहणी; दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी

**खोपोली : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी खालापूर तालुक्यातील रस्त्यांवरील खड्डे पुढील आठ दिवसांत प्राधान्याने बुजवावेत, असे निर्देश पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.पारंगे यांनी आज संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांसमवेत तालुक्यातील विविध ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी केली. यावेळी रस्त्याच्या दुरावस्था संदर्भात नाराजी व्यक्त केली.



आतरगाव -आडोशी, सारसन-साजगाव, बोरगाव, वडविहीर, सोंडेवाडी, काटवण, चिंचमाळ, पोखरवाडी, आंबेवाडी आदी रस्त्यांची पाहणी करताना रस्त्यांची झालेली दयनीय अवस्था त्यांच्या निदर्शनास आली. गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात नागरिकांची ये-जा होत असल्याने रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघाताची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत पुढील आठ दिवसांत खड्डे बुजविण्याची कामे पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.


ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था असल्यास संबंधित ग्रामपंचायतींनी त्या भागातील कंपन्यांच्या व्यवस्थापनाशी समन्वय साधून रस्ते दुरुस्तीसाठी सहकार्य घेण्याचे आवाहनही पारंगे यांनी केले.डोनवत-मिर्कुटवाडी, चौक-आसरे, चौक-लोहप, घोडिवली, नांवंडे, बीड, जांबरुग, खरवई, डोलवली तसेच वावोशी फाटा-परखंदे या रस्त्यांवरील खड्डेही तातडीने बुजविण्याचे निर्देश देण्यात आले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी संदेश पाटील व अभियंता सुदर्शन आगलावे यांनी तालुक्यातील सर्व रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे आश्वासन दिले. यावेळी उपसभापती भाई शिंदे, जिल्हा परिषद सदस्या रेश्माताई पाटील, पंचायत समिती सदस्या देवयानी देशमुख, कमळ भस्मा, सरपंच प्रकाश पाटील, सरपंच विनोद खवळे, उपसरपंच गणेश पाटील, भाजप नेते संदीप पाटील आदी उपस्थित होते.

# खारपाडा टोलनाक्यासंदर्भात आज मुख्यमंत्र्यांची भेट घेणार -पालकमंत्री

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवापूर्वी खारपाडा टोलनाका बंद करण्याच्या मागणीसाठी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे पालकमंत्री भरत गोगावले सोमवारी सांगितले. मुंबई गोवा महामार्गाचे काम अपुर्ण असतांना टोल वसूली करणे अयोग्य असल्याचा पुनरूच्चार त्यांनी केला.



उत्सवप्रिय कोकणाला गणेशोत्सवाचे वेध लागले आहे. येत्या काही दिवसात मुंबई ठाण्यातून लाखो गणेशभक्त गणेशोत्सवासाठी कोकणच्या दिशेने निघणार आहेत. त्यामुळे मुंबई गोवा महामार्गावरील वाहतूक वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवापूर्वी खारपाडा टोल नाक्याबाबत निर्णय घ्यावा अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे गोगावले यांनी सांगीतले. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे. रस्त्याचे काम पूर्ण झाले असेल तर टोल घेण्यास आपली हरकत नाही; मात्र काम अपूर्ण असताना टोल आकारणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनीही खारपाडा टोलनाका बंद करण्याच्या मागणी केली होती. या मागणीचे गोगावले यांनीही समर्थन केले. ते अलिबाग येथे माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

कर्जत तालुक्यातील भागुची वाडी येथील अंगणवाडीतील निकृष्ट पोषण आहाराच्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश प्रशासानाला दिले आहेत. निकृष्ट पोषण आहार पुरवठा करणाऱ्या पुरवठादारावर योग्य ती कारवाई केली जाईल. या प्रकरणात कुणाचीही गय केली जाणार नाही, असेही गोगावले यांनी यावेळी सांगीतले. या अंगणवाडीतील पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने तेथील मदतनीस महिलेने राजीनामा दिला आहे.

# तळा तालुक्यात श्रावणसरी नृत्य स्पर्धा

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात भव्य श्रावणसरी नृत्य स्पर्धेचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महीला आघाडी तळा तालुका व महिला तळा शहर यांचे माध्यमातून तळा येथे खासदार सुनिल तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे,आमदार अनिकेत तटकरे यांचे मार्गदर्शनाखाली गो.म.वेदक विद्यामंदिर तळा येथे आयोजित केल्या होत्या .



या कार्यक्रमाला नगराध्यक्षा माधूरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे,सभापती नथुराम मुकण, उपसभापती रविंद्र मांडवकर,तालुका अध्यक्ष रविंद्र नटे,महिला अध्यक्षा जान्हवी शिंदे जि.प.सदस्या गीताताई जाधव, जि.प.सदस्या नलिनी लोखंडे, पंचायत समिती सदस्या रुपाली तांडेल,शहर अध्यक्षा मेघा सुतार ,ऍड.उत्तम जाधव , युवक अध्यक्ष देवा रामाणे, जगदिश शिंदे, निकीता गायकवाड,सायली घाग,नगरसेवक , नगरसेविका,राष्ट्रवादी कार्यकर्त्ये , महिला आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी या स्पर्धेत ग्रामीण व शहरी अशा एकूण १४ ग्रुपनी भाग घेतला होता.पारंपारिक नृत्याचे सगळ्या महिला वर्गातून छान सादरीकरण करण्यात आले.प्रथम क्रमांक भैरवनाथ महिला मंडळ उसर खुर्द, द्वितीय क्रमांक दर्या सागर वाशी हवेली,तृतीय क्रमांक रोहीदास महिला मंडळ तळा, उत्तेजनार्थ काळकाई. महिला मंडळ वाशी हवेली,,उत्तेजनार्थ एकविरा महिला मंडळ कासार आळी यांनी नंबर पटकावले.या स्पर्धांचे परीक्षण अनिल शेलार यानी पाहीले.

या मध्ये यशस्वी ग्रुपना मान्यवरांचे हस्ते रोख रक्कम व सन्मानचिन्ह देण्यात आले.या स्पर्धांतून ग्रामीण भागातील महिलांना आपले कलागुण दाखविण्याची एक चांगली संधी मिळत असते.

या स्पर्धेला मंत्री आदिती तटकरे यांनी भेट दिली त्याप्रसंगी त्यांनी नृत्य पथकांना शुभेच्छा देत.या स्पर्धांमधून माझ्या महिला भगीनीना आपले कला गुण दाखविण्याचे हक्काचे एक व्यासपीठ निर्माण होऊन त्यांना प्रोत्साहन मिळत असते.असे त्या म्हणाल्या.

# टेंभोडेत पिसाळलेल्या कुत्र्याचा नागरिकांवर हल्ला

## तत्परतेने उपचार; श्वान जेरबंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील टेंभोडे गावात सोमवारी (दि. ७) एका पिसाळलेल्या कुत्र्याने गावातील सहा जणांवर हल्ला केला. यामध्ये शैलेश साळवे, अरबाज शाह, गणेश जाधव, नितेश सिंग, आयुष गायकवाड आणि महिला यांना कुत्रा चावला. त्यांना टेंभोडे आरोग्य केंद्र व नंतर पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार देण्यात आले.

यावेळी नगरसेविका प्रतिभा भोईर, केसरीनाथ भोईर, समीर गायकवाड, संदेश गायकवाड, राज भोईर, परेश भोईर, यश भोईर, आदित्य भोईर, विक्रम म्हसकर, अमर पाटील, डॉ. अक्षयकुमार, डॉ. आदित्य बेंद्रे, सुभाष भोईर, संजय भोईर व महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. अधिकारी मधुलिका लाड यांच्या सहकार्याने या श्वानास पकडण्यात यश आले.



# चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी वृषाली पोळेकर



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चौक उप सरपंचपदी. भाजपाच्या वृषाली पोळेकर यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्यावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

उपसरपंच नैना झिंगे यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदाची आज पीठासीन अधिकारी तथा सरपंच रीतु ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली खास सभा घेण्यात आली. त्यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

भाजपाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, सरपंच रितु ठोंबरे, पूजा हातमोडे, ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे यांच्यासह अनेकानी त्यांचे अभिनंदन केले.

# सिडकोच्या गृहनिर्माण योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या ऑगस्ट २०२६ गृहनिर्माण योजनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, योजनेअंतर्गतविक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या ४,७७९ घरांसाठी एकूण ४,१८० अर्जदारांनी स्वारस्य नोंदविलेआहे. ही घरे नवी मुंबईतील तळोजा, खारघर आणि कळंबोली या नोड्समध्ये उपलब्ध करून देण्यात आलीआहेत.

१५ ऑगस्ट २०२६ रोजी सुरू करण्यात आलेल्या या योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरेउपलब्ध करून देण्यात आली असून, पात्र नागरिकांना नवी मुंबईत परवडणाऱ्या दरात घर घेण्याची संधीमिळाली. ३ सप्टेंबर २०२६ रोजी बुकिंगची मुदत संपली असून, नागरिकांकडून मिळालेला हा उत्कृष्ट प्रतिसाद सिडकोच्या गृहनिर्माण उपक्रमावरील वाढता विश्वास अधोरेखित करणारा आहे.

प्रधानमंत्री आवास योजना शहरी (PMAY-U) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना ₹२.५ लाखांचे अनुदान सप्टेंबर२०२६ पर्यंत उपलब्ध आहे. लागू असलेल्या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वे व पात्रता निकषांच्या अधीन राहून मिळणाऱ्या या अनुदानामुळे पात्र लाभार्थ्यांना घर खरेदी करणे अधिक सुलभ होणार आहे.नागरिकांना स्वतःचे घर घेण्याची संधी अधिक सुलभ व्हावी आणि नियोजित नागरी केंद्रांमध्ये गुणवत्तापूर्ण घरेउपलब्ध व्हावीत, या उद्देशाने सिडकोकडून सातत्याने गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहेत. तळोजा,खारघर आणि कळंबोली हे नवी मुंबईतील वेगाने विकसित होत असलेले नोड्स असून, या परिसरांमध्येपायाभूत सुविधा आणि संपर्कव्यवस्थेचा विस्तार होत आहे.

या योजनेतील लॉटरी अर्जदारांची प्रारूप यादी सिडको होम्सच्या www.cidcohomes.com पोर्टलवरदिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## मराठा समाजासाठी मोठे निर्णय

**१,४४० मराठा-कुणबी तरुणांना मोफत वाहन प्रशिक्षण**

सारथी आणि पिंपरी-चिंचवड येथील आयडीटीआरएस संस्थेच्या माध्यमातून १,४४० मराठा-कुणबी तरुणांना मोफत वाहनचालक आणि वाहक प्रशिक्षण दिले जाणार आहे. एलएमव्ही आणि एचएमव्ही वाहनांसह वाहकाचे प्रशिक्षणही या उपक्रमात समाविष्ट आहे. प्रशिक्षणाला १ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार असून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या किमान १,००० लाभार्थ्यांना रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

सरकारने शिक्षण, आर्थिक मदत, परदेशी शिक्षण आणि रोजगार या चार प्रमुख क्षेत्रांवर भर दिल्याचे दिसून येते. यासोबतच कुणबी नोंदी गावपातळीवर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया आणि आंदोलनात मृत्यू झालेल्यांच्या वारसांना नोकरी देण्याची कार्यवाहीही सुरू आहे.

दरम्यान, सेवानिवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधून काढलेल्या तब्बल ५८ लाख कुणबी नोंदी लवकरच राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये जाहीर केल्या जाणार आहेत. याचसोबत मराठा समाजातील नागरिकांना जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक ती कागदपत्रे गोळा करता यावीत यासाठी १० ते १७ सप्टेंबरदरम्यान राज्यभरात विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ही माहिती दिली.

## १८० कोटींच्या निधीतून होणार विविध कामे

१८० कोटी रुपयांच्या निधीतून प्रस्तावित विकासकामांची प्रक्रिया पुढे नेण्यात येत असून पुढील तीन महिन्यांत या कामांना प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. त्यामुळे करंजा परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होण्यास मदत होणार आहे. विकासकामे वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांशी सातत्याने समन्वय साधला जात असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

करंजा परिसराच्या विकासाबरोबरच मच्छीमार बांधवांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, स्थानिक समस्या सोडविणे आणि परिसराचा भविष्यातील विकास सुनिश्चित करणे यावर विशेष भर देण्यात येत आहे. विकासकामांच्या अंमलबजावणीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होऊ नयेत आणि मंजूर निधीचा योग्य पद्धतीने वापर होऊन त्याचा थेट लाभ स्थानिक नागरिकांना मिळावा यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

"करंजा परिसरातील मच्छीमार बांधव हे आपल्या अर्थव्यवस्थेचा आणि स्थानिक विकासाचा महत्त्वाचा घटक आहेत. त्यांच्या व्यवसायाशी संबंधित अडचणी दूर करून त्यांना आवश्यक पायाभूत सुविधा आणि सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे विकासकामांचे नियोजन करताना मच्छीमार बांधवांच्या सूचना आणि अपेक्षांना प्राधान्य दिले जात आहे," असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, मच्छीमार बांधवांचे हित आणि उरणचा सर्वांगीण विकास हेच आमचे प्राधान्य आहे. करंजा परिसराच्या विकासासाठी १८० कोटी रुपयांच्या निधीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विकासकामे हाती घेतली जात आहेत. या माध्यमातून करंजा परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळेल आणि स्थानिक नागरिकांच्या सुविधांमध्ये मोठी भर पडेल. विकासकामे केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्षात वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

बैठकीस जयविंद्र कोळी, नारायण नाखवा, राजेश नाखवा, भारत नाखवा, सागर नाखवा, शिवदास कोळी यांच्यासह पदाधिकारी, मच्छीमार बांधव, मत्स्यपालन विभागाचे अधिकारी आणि संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीमुळे करंजा परिसरातील मच्छीमार बांधवांच्या विविध प्रश्नांना योग्य दिशा मिळण्याबरोबरच आगामी विकासकामांच्या अंमलबजावणीबाबत स्पष्टता निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिकांच्या सहभागातून आणि संबंधित विभागांशी समन्वय साधून करंजा परिसराचा नियोजनबद्ध आणि सर्वसमावेशक विकास करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### दुखवटा

## आमिना शेख



**माणगांव :** येथील ज्येष्ठ पत्रकार सलीम शेख यांच्या मातोश्री पैगंबरवासी आमिना मुबारक शेख यांचे रविवार दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी ८.१५ वा. जुने माणगाव येथे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्षांचे होते. त्यांच्या पश्च्यात ३ मुले,२ मुली, जावई,सुना,नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शेख व सय्यद कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे येथील कब्रस्तानात दफनविधी करण्यात आला.

# नवी मुंबई विमानतळाजवळ महिलेचा विनयभंग

## कॅबचालक आरोपीचा शोध सुरू

**पनवेल : वार्ताहर**

चेंबूर येथील पार्टी आटोपून कॅबने पनवेलला परतणाऱ्या महिलेसोबत नवी मुंबई विमानतळाजवळ कॅब चालकाने गैरवर्तन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विमानतळापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर निर्जन रस्त्यावर कॅब थांबवून चालकाने महिलेशी गैरवर्तन केल्याचा आरोप आहे.



महिलेने प्रसंगावधान राखत कॅबमधून बाहेर पडून आपली सुटका करून घेतली. याप्रकरणी नवी मुंबई विमानतळ पोलिसांनी कॅब चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार संबंधित महिला पार्टी आटोपल्यानंतर मैत्रिणीने बुक केलेल्या कॅबने पनवेल येथील घरी जात होती. मध्यरात्री सुमारे १.३० वाजता विमानतळ सेवा रस्त्यावर कॅब चालकाने पाणी पिण्याच्या बहाण्याने वाहन थांबवले.

काही वेळाने चालक पुन्हा कॅबमध्ये आला आणि मागील सीटवर बसलेल्या महिलेच्या बाजूला जाऊन बसला. त्याने महिलेशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने चालकाच्या तावडीतून स्वतःची सुटका करून घेत कॅबमधून बाहेर पडण्यात यश मिळवले. त्यानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाला. घटनेनंतर महिलेने कुटुंबीयांशी संपर्क साधला.

कुटुंबीयांसह ती तक्रार दाखल करण्यासाठी पनवेल पोलिसांकडे गेली, मात्र घटनास्थळ नवी मुंबई विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने तिला संबंधित पोलीस ठाण्यात नेण्यात आले. महिलेच्या तक्रारीवरून नवी मुंबई विमानतळ पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तांत्रिक तपास सुरू आहे. पीडित महिलेची ओळख गोपनीय ठेवण्यात आली आहे.

# वलपमध्ये ७३ हजारांची वीजचोरी उघड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील वलप येथील गणेशनगर परिसरात मीटरला बगल देत थेट वीजजोडणी करून ७३ हजार ४० रुपयांची वीजचोरी केल्याचा प्रकार महावितरणच्या भरारी पथकाने उघडकीस आणला. सात खोल्या, पाणीपंप आणि कॉमन लाईटसाठी गेल्या १२ महिन्यांपासून अनधिकृतपणे वीज वापरल्याचे तपासणीत समोर आले. याप्रकरणी संबंधित वीजवापरकर्ते तसेच इमारत मालकाविरुद्ध विद्युत कायदा २००३ मधील कलम १३५ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

शहर विभागाचे उपकार्यकारी अभियंता दीपक गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी आकाश गौरकार व तंत्रज्ञ मुकुंद चितळे यांच्या पथकाने गणेशनगर येथील संबंधित इमारतीची तपासणी केली. यावेळी सात खोल्यांसह पाणीपंप व कॉमन लाईटसाठी मीटरविना थेट वीजपुरवठा घेतल्याचे आढळले. इमारतीच्या पुढील बाजूस असलेल्या मल्टी मीटर बॉक्सच्या बसबारमधून दोन कोअर, ६ चौ. मिमी आकाराच्या सुमारे ३६ फूट लांबीच्या सर्व्हिस वायरद्वारे थेट मुख्य स्विचला जोडणी करण्यात आली होती.

सात खोल्यांसह कॉमन पाणीपंप व लाईट लोडसाठी ७३ हजार ४० रुपयांची वीजचोरी झाल्याचे निश्चित करण्यात आले. वीजचोरीसाठी वापरण्यात आलेल्या दोन कोअरच्या ६ चौ. मिमी वायर महावितरणच्या पथकाने जप्त केल्या असून, त्यावर पंच व अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे सील लावण्यात आले आहे. तपासणीदरम्यान संबंधित खोल्यांचे वीजवापरकर्ते म्हणून विरेंद्र राम, लाला सलमानी, यशोदादेवी निरंजन मुखिया, मनतोष कुमार यादव, निर्मला राजेश द्विवेदी, राजा कुमार यादव व मोहम्मद सलीम यांची नावे समोर आली.

# नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या प्रभारीपदी रेवणसिद्ध ठेंगले

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील अंतर्गत बदल्यांनुसार नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या प्रभारी पोलीस निरीक्षकपदी रेवणसिद्ध ठेंगले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला. यापूर्वी या शाखेचे प्रभारी असलेले पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी ठेंगले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांची वाढणारी वाहतूक लक्षात घेऊन ठेंगले यांनी पदभार स्वीकारताच वाहतूक नियोजनाला सुरुवात केली आहे. गोवा रोडवरील हॉटेल चालक तसेच सीएफएस कंटेनर यार्डच्या व्यवस्थापकांची बैठक घेऊन त्यांनी वाहतूक सुरळीत ठेवण्याबाबत सूचना केल्या. गणेशभक्तांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# तळोजात सहा गोवंशीय जनावरे बेशुद्धावस्थेत; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा गावाजवळ पनवेल–मुंबई महामार्गालगत जामा मशिदीसमोर सिडकोच्या भूखंडावर सहा गोवंशीय जनावरे दयनीय व बेशुद्धावस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस नाईक रत्नाकर बबनराव पाटील यांच्या तक्रारीनुसार गस्तीवर असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली.

यावेळी चार बैल आणि दोन गायी आढळून आल्या. यातील एका बैलासह दोन गायींना इंजेक्शन देऊन बेशुद्ध करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्या शिंगांना, गळ्याला तसेच तोंडाला नायलॉनच्या दोऱ्या बांधून त्यांना झाडांना बांधून ठेवण्यात आले होते. उर्वरित जनावरेही दयनीय अवस्थेत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. जनावरांना अशा प्रकारे बेशुद्ध करून बांधून ठेवण्यामागील नेमका उद्देश काय, याचा तपास तळोजा पोलिसांकडून सुरू आहे. घटनास्थळी आढळलेल्या जनावरांबाबत पोलिसांनी पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली असून या प्रकारामागे कोणाचा सहभाग आहे याचा शोध घेतला जात आहे.

# तळोजा गणेश घाटावर आढळला महिलेचा मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा फेज–१ परिसरातील गणेश घाट येथे पाण्यात अज्ञात महिलेचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृतदेह काही दिवसांपासून पाण्यात असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून तो फुगलेल्या अवस्थेत आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच तळोजा पोलीस ठाण्याचे अधिकारी–कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह पाण्याबाहेर काढून ताब्यात घेतला असून शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नाही. शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, बेपत्ता व्यक्तींच्या नोंदी व अन्य उपलब्ध पुरावे तपासण्यात येत आहेत. मृत महिलेची ओळख पटवण्यासाठीही पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.

# पनवेल सीकेपीच्या कृष्ण जन्माष्टमी सोहळ्याची शतकोत्तर वाटचाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समाजाच्या वतीने साजऱ्या करण्यात येणाऱ्या कृष्ण जन्माष्टमी सोहळ्याला शंभर वर्षांहून अधिक कालखंडाची परंपरा लाभली आहे. शुक्रवार आणि शनिवार रोजी कृष्ण जन्म आणि गोकुळाष्टमीनिमित्त पारंपारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यंदाचे सीकेपी समाजाच्या कृष्ण जन्माष्टमी सोहळ्याचे १०५वे वर्ष होते. सीकेपी समाज पनवेल यांच्या श्री लक्ष्मीनारायण न्यासाच्या वतीने या पारंपरिक सोहळ्याचे प्रतिवर्षी आयोजन करण्यात येते. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी गोकुळाचे आगमन होते. गोकुळ म्हणजे श्रीकृष्णाची सुबक मूर्ती. पनवेलच्या कुंभार वाड्यातील नरेश कुंभार यांच्या कुटुंबीयांच्या वतीने श्रीकृष्णाची शाडू मूर्ती घडविण्याची परंपरा आहे.

यंदाचे वर्षी सीकेपी समाजाचे खजिनदार महेश कर्णिक आणि श्वेता कर्णिक या दांपत्याच्या हस्ते गोकुळ प्राणप्रतिष्ठा, पूजन व आरती करण्यात आली. सीकेपी समाजाच्या श्री लक्ष्मीनारायण मंदिर सभा मंडपामध्ये श्रीकृष्णाचा पाळणा बांधून मध्यरात्री जन्मोत्सव साजरा केला जातो. यावेळी माता भगिनी घरून करून आणलेली विविध मिष्टान्न, पारंपारिक गोड पदार्थ यांचा छपन्न भोग म्हणजेच नैवेद्य अर्पण करतात. यंदाच्या वर्षी रात्री १०.३० वाजता स्नेहश्री सीकेपी महिला मंडळाच्या वतीने भजनाचे आयोजन करण्यात आले होते.

शनिवार ५ सप्टेंबर रोजी सकाळी समाजातील बाळगोपाळांकरता छोटेखानी हंडीचे आयोजन करण्यात आले होते. श्रीकृष्ण आणि राधेच्या वेशभूषेतील बाळ गोपाळांनी या हंडीची मजा लुटली. यावेळी बाळ गोपाळांना चॉकलेट्स आणि चिक्कीचे वाटप करण्यात आले. सायंकाळी पाच वाजता पनवेलच्या श्री बल्लाळेश्वर विसर्जन तलावामध्ये गोकुळाचे पारंपारिक पद्धतीने विसर्जन करण्यात आले.

सायंकाळी मान्यवरांचे उपस्थितीत सीकेपी समाजातील नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी मंचावर उद्योगपती सुधीर उर्फ राजाभाऊ गुप्ते, जवाहर इंडस्ट्रियल इस्टेटचे अध्यक्ष स्वप्निल गुप्ते, विश्वस्त श्रीकृष्ण चित्रे, सचिव गिरीश गडकरी, खजिनदार महेश कर्णिक, विश्वस्त राहुल देशपांडे यांची उपस्थिती होती. विजयश्री देशपांडे यांनी सूत्रसंचालन, तर गौरी राजे यांनी आभार प्रकट केले.

रात्री महाप्रसादाचे आयोजन होते. सीकेपीचे पदाधिकारी, विश्वस्त, युवा मंचचे अध्यक्ष तुषार देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली युवा मंचची उत्साही जेन झी टीम, ज्ञाती बांधव यावेळी उपस्थित होते.



**नवीन पनवेल : हरी ओम मित्र मंडळ आयोजित पनवेलचा राजा चिंतामणीचा भव्य आगमन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, गणेश कडू, सुमित झुंजारराव, नगरसेविका सरस्वती काथारा, शिवानी घरत, प्रिती जॉर्ज, पं.स. उपसभापती भूपेंद पाटील, जिल्हा परिषद सदस्या प्राची जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, सुकापूर ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिवेश भगत, शिवाजी भगत आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्री गणरायाच्या चरणी नतमस्तक होऊन सर्वांच्या सुख–समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली.**

# फौजदारी वकिलीच्या कौशल्यावर बीसीटी लॉ कॉलेजमध्ये व्याख्यान



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय, नवीन पनवेल येथील कौशल्य विकास समिती आणि पनवेल वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ‘The Art of Criminal Practice – फौजदारी वकिलीचे कौशल्य’ या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील बीएएलएलबी आणि एलएलबी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांना फौजदारी खटल्यांमधील प्रत्यक्ष कामकाज, न्यायालयीन प्रक्रिया, युक्तिवाद कौशल्य, केसची तयारी तसेच फौजदारी वकिलीच्या व्यावहारिक पैलूंची माहिती मिळावी, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते ॲड. इंद्रजीत भोसले यांनी विद्यार्थ्यांना फौजदारी वकिलीच्या प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित मार्गदर्शन केले. त्यांनी फौजदारी खटल्यांची तयारी, न्यायालयीन कामकाज, प्रभावी युक्तिवाद, वकिलांची भूमिका आणि व्यावसायिक कौशल्ये याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. संवादात्मक पद्धतीने झालेल्या या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष वकिलीतील बारकावे समजून घेण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमासाठी पनवेल बार असोसिएशनच्या वतीने ॲड. अस्मिता भुवड आणि ॲड. मनोज म्हात्रे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे महाविद्यालय आणि प्रत्यक्ष वकिली करणाऱ्या बार यांच्यातील शैक्षणिक व व्यावसायिक सहकार्याला अधिक बळ मिळाले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बीएएलएलबी समन्वयक सहाय्यक प्राध्यापक धनश्री चौगले यांनी कार्यक्रमाच्या समन्वयात महत्त्वाची भूमिका बजावली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर्या कदम यांनी केले. विशेष व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व उपयुक्त ठरले. कार्यक्रमाच्या शेवटी सुयशा पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना फौजदारी वकिलीच्या प्रत्यक्ष क्षेत्राची ओळख होऊन त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांच्या विकासाला चालना मिळाली.

# पनवेलमध्ये श्रीकृष्ण जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री अय्यप्पा सेवा संघ पनवेल आणि बालगोकुल पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच विविध हिंदू संघटनांच्या सहकार्याने श्रीकृष्ण जयंती महाशोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात ही महाशोभायात्रा संपन्न झाली.

शोभायात्रेत पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक संतोष शेट्टी, माजी नगरसेवक गणेश कडू, जिल्हा परिषद उपाध्यक्ष उपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव तसेच पंचायत युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते. शोभायात्रेत २००हून अधिक राधा–कृष्णाच्या वेशभूषेतील बालगोपाल तसेच डोक्यावर मंगलकलश घेतलेल्या महिला आणि १५००हून अधिक भाविक सहभागी झाले होते.

बालाजी मंदिरापासून सुरू झालेली शोभायात्रा धार्मिक कार्यक्रमांच्या वातावरणात अय्यप्पा मंदिरापर्यंत पोहोचली. यावेळी बालक, युवक व महिलांनी उत्साहाने सहभाग घेत उरीअडीचा कार्यक्रमही पार पडला.

# वीर वाजेकर महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयात शिक्षक दिन तथा सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी स्टाफ वेल्फेअर कमिटीतर्फे आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य आमोद ठक्कर म्हणाले की, अशैक्षणिक कामांच्या ओझ्याने प्राथमिक शिक्षणाची हेळसांड चालू असताना महाविद्यालयीन स्तरावर शिकवणाऱ्या शिक्षकांची जबाबदारी वाढलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी, कौशल्य विकास, भारतीय ज्ञान परंपरेचे पुनरुज्जीवन आणि संशोधन यांसारख्या अनेक गोष्टींची आव्हाने समोर असताना उच्च शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांची जबाबदारी आणि उत्तरदायित्व मोठे आहे.

त्यासाठी शिक्षकांनी स्वतःचा व्यासंग वाढवणे आवश्यक आहे. समाजात अजूनही शिक्षकांकडे आशेने पाहिले जाते. देशाचे उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी आजही शिक्षकांकडेच आशेचा किरण किंवा खरे मार्गदर्शक म्हणून बघितले जात आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुप्रिया नवले यांनी केले, तर आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य संदीप घोडके यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनराज ढवळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्टाफ वेल्फेअर कमिटीमधील सदस्यांनी व इतर सेवकांनी सहकार्य केले. यावेळी सर्व महाविद्यालयीन स्टाफ उपस्थित होता.



**पनवेल : आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती ‘ड’ सभापती अजय बहिरा, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त मंगला माळवे, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे, सामान्य प्रशासन विभागप्रमुख कीर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी आदींसह महापालिका अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.**

## संपादकीय

# बालपण जपायला हवे

खेळताना धावणारी, मित्रांशी गप्पा मारणारी, मातीने हात माखवून खेळण्यात गुंग झालेली आणि मोठ्यांना पुन्हा-पुन्हा प्रश्न विचारून जग समजून घेणारी मुले आता तासन्‌तास स्क्रीनला खिळून बसलेली दिसतात. बालविश्वातील या बदलांची गंभीर दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच शिक्षक दिनाच्याा निमित्ताने घेतली ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

**जगभरात मुलांच्या वर्तनातील बदलांवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून त्यास जबाबदार असलेला मोबाइल, स्क्रीन, अन्य डिजिटल उपकरणे, एआय आदींच्या वापराचा प्रभाव गांभीर्याने विचारात घेऊन त्यानुसार नियमांची अंमलबजावणीही केली जाते आहे. आपल्या देशातही मुलांवर होणारे स्क्रीनच्या वापराचे दुष्परिणाम चर्चेत असले तरी डिजिटल उपकरणांचा वापर जितक्या प्रमाणात समाजाचा खालच्या स्तरापर्यंत झिरपला आहे, त्याप्रमाणात संबंधित जागरुकता मात्र अद्याप पोहोचलेली दिसत नाही. मुलांची बोटे मोबाइलच्या कीपॅडवर वेगाने फिरतात, मात्र त्यांचा कुटुंबातील व आसपासचा संवाद मात्र कमी होत चालला आहे. त्यामुळेच राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांशी संवाद साधताना पंतप्रधानांनी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या केवळ गुणांकडे न पाहता त्यांच्या वर्तनातील आणि दैनंदिन जीवनातील बदलांकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. मुलांचे बालपण जपणे, त्यांची नैसर्गिक जिज्ञासा जोपासणे आणि तिला योग्य दिशा देणे ही शिक्षकांची मोठी जबाबदारी असल्याचे मोदींनी अधोरेखित केले. आजच्या काळात हा संदेश अत्यंत गरजेचा आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर हा आधुनिक जीवनात अतिशय सोयीचा व त्यामुळेच अपरिहार्य होत चालला असला तरी तंत्रज्ञानाचा वापर आणि त्याचे व्यसन यातील सीमारेषा आपण सगळ्यांनीच व विशेषत: पालक आणि शिक्षकांनी ओळखणे गरजेचे आहे. स्क्रीन टाइम कमी करण्यासाठी मुलांना मैदानी खेळ, शारीरिक व्यायाम आणि सर्जनशील उपक्रमांकडे वळवण्याचा मोदींनी दिलेला सल्ला म्हणूनच अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्यक्ष संवादाची जागा फोनवरील चॅटिंग वा सततच्या स्क्रीनवापराने घेतली तर त्यातून मुलांचा निव्वळ संवाद खुंटतो असे नाही तर त्यांच्या भावनिक विकासावरही परिणाम होतो. मुलाने काय पाहिले, काय वाचले यापेक्षा त्याने काय अनुभवले, तो कोणाशी बोलला, त्याने कोणते प्रश्न विचारले आणि स्वतः काही निर्माण केले का, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणूनच मुलांकडे 'स्क्रीन कमी करा' अशी कटकट करण्यापेक्षा त्यांचे स्क्रीनच्या पलीकडे अधिक समृद्ध जग उभे राहणे महत्त्वाचे आहे. पंतप्रधानांनी महाविद्यालयीन शिक्षकांना अमली पदार्थांच्या धोक्याविषयीही विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन केले. मोठी शहरे आणि विद्यापीठांमध्ये हा धोका अधिक गुंतागुंतीचा असल्याचे दिसते. विद्यार्थ्यांच्या वर्तनात अचानक बदल जाणवला तर त्याकडे दुर्लक्ष न करता त्यामागचे कारण समजून घेण्याची संवेदनशीलता शिक्षकांनी दाखवावी असेही मोदींनी सांगितले. शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तके, परीक्षा आणि गुण नव्हेत. चांगला नागरिक, संवेदनशील माणूस आणि आत्मविश्वासपूर्ण व्यक्ती घडवणे हेही शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. पंतप्रधानांचा हा आग्रह राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या व्यापक दृष्टिकोनाशीही सुसंगत असाच आहे. शिक्षकांनी अभ्यासक्रमाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रवेश करावा, हा मोदींचा संदेश आजच्या शिक्षणव्यवस्थेसाठी दिशादर्शक आहे. मुलांचे बालपण जपले, त्यांची जिज्ञासा जिवंत ठेवली आणि त्यांना खेळ, सर्जनशीलता व संवादासाठी आवश्यक मोकळीक दिली तर भविष्यातील भारत अधिक कुशलच नव्हे तर अधिक संवेदनशीलही घडेल. राष्ट्रनिर्मितीत शिक्षकांची ही भूमिका सर्वाधिक महत्त्वाची आहे.**

# प्लास्टिकमुक्त जीवन : गरज की काळाची हाक?



प्लास्टिकने गेल्या शतकात मानवी जीवनात मोठी सोय आणली. हलके, पाणी न झिरपणारे, टिकाऊ आणि कमी खर्चात बनणारे म्हणून प्लास्टिक प्रत्येक घरात पोहोचले. ब्रश, बादली, डबा, पिशवी, मोबाईल कव्हर, गाडीचे भाग ते औषधांचे पॅकिंग, सर्वत्र प्लास्टिक आहे. मात्र हेच प्लास्टिक आज पृथ्वीसमोरचे सर्वात मोठे पर्यावरणीय संकट बनले आहे. प्लास्टिक टाळणे ही आता पर्याय राहिलेला नाही, ती आपल्या आणि पुढच्या पिढ्यांच्या भविष्यासाठीची गरज आहे.जगात दरवर्षी ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक तयार होते. यातील ५०% प्लास्टिक 'सिंगल यूज' प्रकारचे असते. म्हणजे पाण्याची बाटली, स्ट्रॉ, चिप्सचे पाकिट, कॅरीबॅग यांसारख्या वस्तू काही मिनिटांच्या वापरानंतर फेकल्या जातात. प्लास्टिक नैसर्गिकरित्या कुजत नाही.

एक प्लास्टिक पिशवी नष्ट व्हायला ५०० ते १००० वर्षे लागतात, तर पाण्याच्या बाटलीला त्याहून अधिक काळ लागतो. त्यामुळे १९५० पासून तयार झालेले जवळपास ८०% प्लास्टिक आजही जमिनीत, नद्यांमध्ये किंवा समुद्रात तसेच आहे.भारताचा विचार केला तर देशात दररोज २६,००० टनांहून अधिक प्लास्टिक कचरा निर्माण होतो. मोठ्या शहरांमध्ये हा आकडा अधिक आहे. हा कचरा योग्य पद्धतीने गोळा झाला नाही तर नाले तुंबतात, पूर येतो. समुद्रात जाणारा प्लास्टिक कचरा लाटांबरोबर आणि सूर्यप्रकाशामुळे तुटून त्याचे 'मायक्रोप्लास्टिक' तयार होते. हे ५ मिमीपेक्षा लहान तुकडे आता पिण्याच्या पाण्यात, समुद्री मिठात, मधात आणि माशांमध्येही सापडले आहेत. २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका जागतिक अहवालानुसार, सरासरी व्यक्ती दर आठवड्याला एका क्रेडिट कार्डाएवढे मायक्रोप्लास्टिक नकळत खातो.प्लास्टिकचा फटका फक्त निसर्गालाच नाही तर थेट आपल्या आरोग्यालाही बसतो. अनेक प्लास्टिक वस्तूंमध्ये BPA, थॅलेट्स, स्टायरीन यांसारखी रसायने वापरली जातात. गरम चहा प्लास्टिक कपात घेतल्यास, किंवा प्लास्टिक डब्यात अन्न मायक्रोवेव्हमध्ये गरम केल्यास, ही रसायने अन्नात उतरतात. ही रसायने शरीरातील हार्मोन्सच्या कार्यात अडथळा आणतात. लहान मुलांमध्ये विकासासंबंधी समस्या, महिलांमध्ये प्रजननासंबंधी अडचणी आणि सर्व वयोगटात रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे यांसारखे परिणाम दिसून येतात.

प्लास्टिक कचरा उघड्यावर जाळल्याने डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे अतिशय विषारी वायू हवेत मिसळतात. त्यामुळे दमा, त्वचारोग आणि दीर्घकालीन आजारांचा धोका वाढतो.समुद्री जीवनावर तर प्लास्टिकने घाला घातलाच आहे. कासवांना प्लास्टिक पिशव्या जेलीफिश वाटतात आणि ती खाल्ल्याने त्यांचा मृत्यू होतो. पक्षी बाटल्यांची झाकणे अन्न समजून पिल्लांना भरवतात. मासेमारीच्या टाकून दिलेल्या जाळ्यांना 'घोस्ट नेट' म्हणतात. ही जाळी शेकडो वर्षे समुद्रात तरंगत राहतात आणि त्यात मासे, डॉल्फिन अडकून मरतात. २०२६ च्या सुरुवातीला झालेल्या एका मोहिमेत अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरून केवळ एका आठवड्यात १८ टन प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला. यावरून समस्येची व्याप्ती लक्षात येते.मग यावर उपाय काय? उपायाची सुरुवात आपल्या घरापासून आणि आपल्या सवयींपासून होते. प्रत्येकाने छोटे बदल केले तरी एकत्रित परिणाम खूप मोठा होतो.पहिला आणि सर्वात सोपा उपाय म्हणजे 'नकार द्यायला शिका'. दुकानदाराने प्लास्टिक पिशवी दिली तर 'नको, माझ्याकडे कापडी पिशवी आहे' असे सांगण्याची सवय लावा. भाजी, फळे, धान्य खरेदीसाठी कायम कापडी, तागाची किंवा ज्यूटची पिशवी जवळ बाळगा. एक चांगली कापडी पिशवी ५०० पेक्षा जास्त प्लास्टिक पिशव्यांची गरज संपवते.

पाण्यासाठी स्टील किंवा तांब्याची बाटली वापरा. बाहेर जाताना घरून पाणी नेल्याने प्रवासात प्लास्टिक बाटली विकत घ्यावी लागत नाही. ऑफिस, कॉलेजमध्ये स्वतःचा कप आणि चमचा ठेवा. ऑनलाइन जेवण मागवताना 'कटलरी नको' हा पर्याय निवडा.दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'पुन्हा वापरा आणि योग्य विल्हेवाट लावा'. ज्या प्लास्टिक वस्तू आधीच घरात आल्या आहेत, त्या लगेच फेकू नका. जाड प्लास्टिकचे डबे साठवणीसाठी, बाटल्यांपासून झाडांसाठी कुंड्या बनवता येतात. याला 'अपसायकलिंग' म्हणतात. जे प्लास्टिक खरोखरच टाकायचे आहे, ते स्वच्छ करून, सुके करून वेगळे ठेवा. ओला कचरा आणि सुका कचरा एकत्र केल्याने प्लास्टिक रिसायकल होऊ शकत नाही. अनेक शहरांमध्ये आता 'प्लास्टिक बँक' आणि 'कचरा वेचक' केंद्रे आहेत जिथे स्वच्छ प्लास्टिक दिल्यास त्याचा पुनर्वापर होतो. २०२६ मध्ये अनेक गृहनिर्माण सोसायट्यांनी स्वतःचे 'झीरो वेस्ट' उपक्रम सुरू केले आहेत, जिथे रहिवासी एकत्र येऊन प्लास्टिकचे व्यवस्थापन करतात.तिसरा मार्ग म्हणजे 'प्लास्टिकला पर्याय निवडणे'. बाजारात आता अनेक चांगले पर्याय उपलब्ध आहेत. बांबूपासून बनवलेले ब्रश, स्टीलच्या स्ट्रॉ, काचेच्या किंवा स्टीलच्या डबे, मातीची भांडी, केळीच्या पानांच्या पत्रावळी, उसाच्या चिपाडापासून बनवलेले डिश हे सर्व पर्याय सहज मिळतात. २०२५ नंतर 'कंपोस्टेबल प्लास्टिक'चा वापर वाढला आहे. हे मक्याच्या स्टार्चपासून किंवा बांबूच्या फायबरपासून बनते आणि ९० दिवसांत मातीत पूर्णपणे विरघळते. लग्नसमारंभ, वाढदिवस यांसारख्या कार्यक्रमांसाठी आता भाड्याने स्टीलची भांडी देणाऱ्या सेवा सुरू झाल्या आहेत, ज्यामुळे थर्माकोल आणि प्लास्टिक डिशचा वापर टाळता येतो.चौथी गोष्ट म्हणजे 'जागरूकता पसरवणे'. लहान मुलांना शाळेतूनच प्लास्टिकचे तोटे समजावून सांगितले पाहिजेत. 'बेस्ट आऊट ऑफ वेस्ट' सारख्या स्पर्धांमधून मुलांना प्लास्टिकच्या पुनर्वापराचे महत्त्व कळते. समुद्रकिनारे, बगिचे, गड-किल्ले येथे स्वच्छता मोहिमांमध्ये सहभागी व्हावे. सोशल मीडियाचा वापर करून चांगल्या सवयी लोकांपर्यंत पोहोचवाव्यात. जेव्हा एक व्यक्ती बदलते, तेव्हा ती दहा जणांना प्रेरणा देते.


भविष्यासाठी आशादायक गोष्टीही घडत आहेत. संशोधक प्लास्टिक खाणाऱ्या बॅक्टेरिया आणि बुरशीवर काम करत आहेत. २०२६ मध्ये 'प्लास्टिक ते इंधन' बनवणारे छोटे प्रकल्प अनेक ठिकाणी यशस्वी झाले आहेत. रस्ते बनवण्यासाठी प्लास्टिक कचरा वापरण्याचे तंत्रज्ञान आता अधिक विकसित झाले आहे. असे रस्ते जास्त टिकाऊ आणि पाण्याला प्रतिरोध करणारे असतात. अनेक मोठ्या कंपन्या 'प्लास्टिक न्यूट्रल' होण्याच्या दिशेने काम करत आहेत. म्हणजे त्या जितके प्लास्टिक बाजारात आणतात, तितके प्लास्टिक त्या पर्यावरणातून गोळा करून रिसायकल करतात. शुद्ध हवा, पाणी, अन्न, सावली. त्याची परतफेड करणे हे आपले कर्तव्य आहे. प्लास्टिक टाळणे ही शिक्षा नाही, तर निसर्गाशी नव्याने नाते जोडण्याची संधी आहे. आज एक पिशवी नाकारली, एक बाटली पुन्हा वापरली, तर उद्याचा समुद्र अधिक स्वच्छ असेल, उद्याची नदी अधिक निर्मळ असेल व उद्याची पिढी अधिक निरोगी असेल. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### वायफाय राउटरने शरीरात काय बदल होतो?

हैदराबादमधील लकडी का पूल येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटलमधील कन्सल्टंट फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट आणि क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉक्टर हिरन एस. रेड्डी म्हणाले की, एका आठवड्यासाठी रात्री वायफाय राउटर बंद केल्याने व्यक्तींमध्ये शारीरिक बदल होण्याची शक्यता फारच कमी आहे.




वायफाय उपकरणे लो लेव्हल, नॉन-आयोनायझिंग रेडिएशन उत्सर्जित करतात, जे वैज्ञानिक एकमतानुसार दररोजच्या संपर्कासाठी सुरक्षित आहेत. पण, ज्या लोकांना इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्ड्स (EMFs) बद्दल संवेदनशीलता असल्याचे आढळले आहे त्यांच्यासाठी, हा बदल डोकेदुखी, झोपेचा त्रास किंवा मानसिक थकवा यासारख्या लक्षणांपासून आराम देऊ शकतो. असे असले तरीही इलेक्ट्रोमॅग्नेटिक अतिसंवेदनशीलतेचे समर्थन करणारे क्लिनिकल पुरावे अनिर्णित आहेत, असे डॉक्टर हिरन एस. रेड्डी म्हणाले आहेत.

डॉक्टर सुधीर कुमार यांच्या मते, वाय-फाय राउटर २.४ GHz किंवा ५ GHz फ्रिक्वेन्सी बँडमध्ये नॉन-आयोनायझिंग रेडिएशन उत्सर्जित करतात; जे खूप कमी-ऊर्जेचे ईएमएफ आहेत आणि जे मोबाईल फोन डोक्याजवळ धरल्यावर उत्सर्जित होणाऱ्या किरणांपेक्षा खूपच कमी आहेत.

घरामध्ये १ ते २ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त अंतरावर असताना या EMFsची तीव्रता झपाट्याने कमी होते. त्यामुळे एक सामान्य वायफाय राउटर मेलाटोनिन या झोपेस मदत करणाऱ्या संप्रेरकाच्या निर्मितीवर परिणाम करतो किंवा पीनियल ग्रंथीचं (pineal gland) काम बिघडवतो, ही शक्यता खूपच कमी आहे. दुसरीकडे, ब्लू लाईट पाइनल ग्रंथीच्या कार्यात व्यत्यय आणून झोपेच्या गुणवत्तेवर आणि प्रमाणावर प्रतिकूल परिणाम करतो

याव्यतिरिक्त, रात्रीच्या वेळी डिजिटल एंगेजमेंट कमी केल्याने मेलाटोनिनचे उत्पादन चांगले होऊ शकते, जे झोपण्याच्या आणि उठण्याच्या चक्राचे नियमन करण्यासाठी जबाबदार आहेत तसेच रात्री वायफाय बंद करण्याचा झोपेच्या गुणवत्तेवर अप्रत्यक्षपणे फायदे होतो. म्हणजेच वायफायचा वापर दीर्घकाळ स्क्रीन एक्सपोजरशी संबंधित असतो. त्यामुळे वायफाय बंद केल्याने रात्रीचा स्क्रीन वापर मर्यादित होऊ शकतो, शांत झोप लागण्यास मदत होऊ शकते.

# संगीतकार, गायक भूपेन हजारिका



## निमित्त

भूपेन हजारिका यांचा जन्म ८ सप्टेंबर १९२६ रोजी आसाममधील सादिया येथे ब्रह्मपुत्रा नदीच्या काठावर झाला. त्यांचे वडील नीलकंठ हजारिका शिवसागर जिल्ह्यातील नाझिरा येथील, तर आई शांतीप्रिया हजारिका. दहा मुलांमध्ये थोरले असलेल्या भूपेन यांच्यावर आईच्या संगीताचा प्रभाव होता. आईने त्यांना अंगाई गीते आणि आसामी लोकसंगीताची ओळख करून दिली.वडील नोकरीच्या शोधात १९२९मध्ये गुवाहाटीच्या भारालुमुख येथे गेले, तिथे भूपेन यांचे बालपण गेले. १९३२मध्ये धुबरी आणि १९३५मध्ये तेजपूर येथे कुटुंब स्थायिक झाले.

तेजपूरमध्येच वयाच्या दहाव्या वर्षी त्यांना ज्योतिप्रसाद अगरवाला आणि विष्णू प्रसाद राभा या आसामी संस्कृतीतील दिग्गजांनी शोधले. एका सार्वजनिक कार्यक्रमात त्यांनी आईने शिकवलेले बोरगीत गायले. १९३६ मध्ये त्यांच्यासोबत कोलकात्याला जाऊन सेलोना कंपनीसाठी अरोरा स्टुडिओत पहिले गाणे रेकॉर्ड केले.वयाच्या बाराव्या वर्षी अगरवाला यांच्या इंद्रमालती चित्रपटात त्यांनी काखोते कोलोसी लोई आणि बिस्वो बिजोयी नौजवान ही गाणी गायली. वयाच्या चौदाव्या वर्षी अग्निजुगर फायरिंगाथी मै हे क्रांतिकारी गीत लिहिले.त्यांचे शिक्षण सोनाराम हायस्कूल गुवाहाटी, धुबरी गव्हर्नमेंट हायस्कूल आणि तेजपूर हायस्कूलमध्ये झाले. १९४०मध्ये मॅट्रिक, १९४२मध्ये कॉटन कॉलेजमधून इंटरमिजिएट, बनारस हिंदू विद्यापीठातून राज्यशास्त्रात बीए आणि एमए केले.

काही काळ गुवाहाटी आकाशवाणीवर काम केल्यानंतर कोलंबिया विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळून १९४९मध्ये ते न्यूयॉर्कला गेले. प्रौढ शिक्षणात दृकश्राव्य तंत्रांच्या वापरावर प्रबंध लिहून १९५२मध्ये पीएचडी मिळवली. तिथे नागरी हक्क नेते पॉल रॉबसन यांच्याशी मैत्री झाली.

रॉबसन म्हणायचे गिटार हे संगीताचे वाद्य नाही तर सामाजिक साधन आहे. याच विचारातून बिस्तिर्नो पारोरे हे गाणे रॉबसन यांच्या ओल्ड मॅन रिव्हरवरून प्रेरित होऊन तयार झाले. वी आर इन द सेम बोट ब्रदर हे गीत त्यांच्या कार्यक्रमांचा भाग बनले. कोलंबियात प्रियंवदा पटेल यांच्याशी भेट होऊन १९५०मध्ये विवाह झाला. १९५२मध्ये मुलगा तेज यांचा जन्म झाला आणि १९५३मध्ये ते भारतात परतले.

भारतात परतल्यावर गुवाहाटी विद्यापीठात अध्यापन केले, नंतर कोलकात्यात संगीत दिग्दर्शक म्हणून स्थायिक झाले. शकुंतला, प्रतिध्वनीसह अनेक आसामी चित्रपट केले. बांगलादेशी चित्रपटांनाही संगीत दिले. १९९३मध्ये आसाम साहित्य सभेचे अध्यक्ष झाले. १९६७मध्ये नौबोइचा मतदारसंघातून अपक्ष आमदार म्हणून निवडून आले.१९७०च्या दशकात हेमेंद्र प्रसाद बरुआ यांच्यामार्फत कल्पना लाजमी यांच्याशी ओळख झाली. एक पल, रुदाली, दमन या हिंदी चित्रपटांना संगीत दिले. २००४मध्ये गुवाहाटी लोकसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली पण पराभव झाला. भूपेन हजारिका यांनी बांगलादेशातील चित्रपटांसाठी संगीत दिले, ज्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसा मिळाली. ३० जून २०११ रोजी मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात ते दाखल झाले आणि ५ नोव्हेंबर २०११ रोजी त्यांचे निधन झाले. ब्रह्मपुत्रा काठी त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले, तेव्हा पाच लाख लोक उपस्थित होते.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### युरिक ॲसिडमुळे शरीरावर होतात गंभीर परिणाम



आपल्या शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्यामुळे त्याचा आपल्या शरीरावर गंभीर परिणाम होतो. मग काही लोकांचे सांधे जड होतात, त्यांचे हात पाय दुखतात तर काही लोकांच्या पायाला सूज येते, त्यांना थकवा येतो किंवा त्यांच्या टाचा दुखतात. तर अशा समस्यांपासून जर तुम्हाला आराम मिळवायचा असेल तर फळं खाणं खूप गरजेचं आहे.

**संत्री** – संत्री खाल्ल्यामुळे आपल्या शरीरात युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होते. संत्रामध्ये विटामिन सी असते त्यामुळे ते आपल्या किडनीचे आरोग्य सुधारते तसेच यूरिक सिडची पातळीदेखील नियंत्रित करते. तसेच संत्री खाल्ल्यामुळे सांधेदुखी पासूनदेखील आराम मिळतो. सोबतच यूरिक सिड वाढल्यानंतर टाच दुखत असेल तर संत्री खा यामुळे तुमची टाच दुखीदेखील कमी होण्यास मदत होईल.

**किवी** – जर तुमच्या शरीरात यूरिक सिडचे प्रमाण जास्त असेल तर तुम्ही किवी जरूर खा. किवीमध्ये अनेक पौष्टिक घटक असतात जे युरिक ॲसिडचे प्रमाण नियंत्रणात आणण्यास मदत करतात. किवीमध्ये पोटॅशियम, विटामिन सी, फोलेट, विटामिन ई असते जे यूरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यास मदत करते.

**स्ट्रॉबेरी** – स्ट्रॉबेरी यूरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यासाठी मदत करते. स्ट्रॉबेरीमध्ये देखील विटामिन सी असते ज्यामुळे आपल्याला सांधेदुखीपासून आराम मिळतो. स्ट्रॉबेरीमध्ये फायबर, कॅल्शियम, विटामिन सी, मॅग्नेशियम असे पोषक घटक असतात जे आपलं शरीर निरोगी ठेवतात आणि यूरिक ॲसिड नियंत्रणात आणण्यासाठी मदत करतात. यासाठी तुम्ही स्ट्रॉबेरीचा रस देखील घेऊ शकता.

**अननस** – अननस हादेखील युरिक ऍसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत करतो. अननसामध्ये विटामिन सी भरपूर प्रमाणात असते जे फायबर प्युरीन पचवण्यास मदत करते. जर तुम्हाला युरिक ॲसिडचा त्रास होत असेल तर अननसाचे सेवन जरूर करा. त्यामुळे तुमची युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होईल.

# नवी मुंबईतील सुरक्षेवर बैठक

## आमदार मंदा म्हात्रे यांची पोलीस आयुक्तांशी चर्चा

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत आमदार मंदा म्हात्रे यांनी सोमवारी (दि. ७) पोलीस आयुक्तांची भेट घेऊन शहरातील विविध गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. अमली पदार्थांची विक्री, वाढती गुन्हेगारी, ध्वनिप्रदूषण, पोलिसांची कार्यपरिस्थिती, महिला व विद्यार्थ्यांची सुरक्षा तसेच वाहतूक कोंडी या विषयांवर त्यांनी ठोस उपाययोजनांची मागणी केली. यावेळी निलेश म्हात्रे, माजी नगरसेवक राजू शिंदे, पोलीस पाटील दिलीप पाटील, विकास सोरटे तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

नवी मुंबईला नशामुक्त करण्यासाठी भरारी पथकांनी कारवाई करावी, शाळा-महाविद्यालयांबाहेर अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांसोबतच त्यामागील मुख्य सूत्रधार व पुरवठा साखळीवर कारवाई करावी, तरुण पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यातून वाचवण्यासाठी मोहीम राबवावी, अशी मागणी त्यांनी केली.



पोलिसांच्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर अधिकारी-कर्मचाऱ्यांवरील मानसिक ताण, कामाचा वाढता ताण, दीर्घ ड्युटीचे तास व अपुरी विश्रांती याबाबतही आमदार मंदा म्हात्रे यांनी चिंता व्यक्त केली. पोलिसांना सकारात्मक कार्यपरिस्थिती मिळावी तसेच त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी आवश्यक समुपदेशन व सहाय्य उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर नियमबाह्य डीजे व ध्वनिप्रदूषणावर कठोर नियंत्रण ठेवण्याची मागणीही त्यांनी केली. नागरिकांना त्रास होईल अशा पद्धतीने मोठ्या आवाजात डीजे व ध्वनिक्षेपक वाजवणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत संवेदनशील भागांत पोलिसांची गस्त वाढवणे, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात विशेष लक्ष ठेवणे व ज्येष्ठांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली. नवी मुंबईतील वाहतूक कोंडीचा प्रश्नदेखील त्यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिला.

प्रमुख चौक, अरुंद रस्ते, अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणे आणि वाढती वाहनसंख्या यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येवर तातडीने आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. या सर्व मुद्द्यांची पोलीस आयुक्तांनी सकारात्मक दखल घेत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. नवी मुंबई सुरक्षित, नशामुक्त आणि गुन्हेगारीमुक्त करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या प्रश्नांवर प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून आवश्यक उपाययोजना करून घेण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

# घणसोलीत गणरायाचे धूमधडाक्यात आगमन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गुरुकृपा सेवा मंडळ गणेशनगर, घणसोलीच्या १० फुटी आकर्षक गणराजाचे आगमन नुकतेच धूमधडाक्यात झाले. यावेळी संगीताच्या तालावर शिस्तीत हजारो तरुणाई थिरकली. मंडळाचे मार्गदर्शक रवींद्र राजीवडे यांचे नियोजन वाखाणण्याजोगे होते. तत्पूर्वी नगरसेवक तथा आरोग्य समिती उपसभापती गणेश सकपाळ यांच्या हस्ते गणरायाचे पूजन करून आगमनाला सुरुवात झाली.

गुरुकृपा सेवा मंडळाच्या गणराजाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने गणेशभक्तांमध्ये मोठा जोश पाहायला मिळाला. मंडळाचे पदाधिकारी विनायक वालगुडे व दीक्षांत रावडे यांनी पेण येथून गणरायाची सुबक मूर्ती घणसोली येथील शेतकरी शिक्षण मंडळाच्या संकुलापर्यंत



रात्री आठच्या सुमारास आणली. त्यानंतर आगमनाला सुरुवात झाली.

दरम्यान, मीनाताई चौगुले रुग्णालय ते गणेशनगर येथील मंडपाच्या समोर असलेल्या रस्त्यावर तरुणाई, ज्येष्ठ नागरिक आणि महिलावर्ग पारंपरिक पेहरावात सजून बाप्पाच्या स्वागतासाठी सज्ज झाले होते. त्यांनी गणरायाची सुंदर आणि आकर्षक मूर्ती मंडपात नेण्यापूर्वी अध्यात्मिक पद्धतीने पूजन केले. त्यानंतर गणरायाची मूर्ती आसनस्थळी थाटामाटात विराजमान झाली. आगमनासाठी मंडळाचे अध्यक्ष सुनील साळेकर, शाहू कोकाटे, सुनील पोखरकर, प्रदीप साळेकर, नवनाथ रांजणे, नितीन वाळुंज, सुभाष रांजणे, रमेश वालगुडे, संतोष रांजणे, सुमित रांजणे, विनीत धुमाळ यांनी विशेष मेहनत घेतली.

# नवी मुंबईत पहिल्यांदाच कॉमिक कॉन इंडियाचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतातील सर्वांत मोठा पॉप-कल्चर महोत्सव असलेला कॉमिक कॉन इंडिया पहिल्यांदाच नवी मुंबईत आयोजित होणार आहे. २८ व २९ नोव्हेंबर रोजी सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर येथे महोत्सव होणार असून मुंबई महानगर प्रदेशातील चाहत्यांना कॉमिक्स, अ‍ॅनिमे, गेमिंग व कॉस्प्लेचा अनुभव घेता येणार आहे.

कॉमिक कॉन इंडियाने पहिल्यांदाच नवी मुंबईत महोत्सव आयोजित करण्याची घोषणा केली आहे. नवी मुंबईचा समावेश यंदाच्या कार्यक्रमांच्या यादीत झाल्यामुळे चाहत्यांना कॉमिक्स, अ‍ॅनिमे, गेमिंग, कॉस्प्ले, पॉप-कल्चर आणि मनोरंजनाशी संबंधित विविध अनुभव घेता येणार आहेत. याआधी विशाखापट्टणम हे २०२६-२७च्या नव्या सीझनची सुरुवात करणारे पहिले शहर जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर नवी मुंबईची घोषणा करण्यात आली आहे.

# नवी मुंबईत २६ शिक्षकांचा नेशन बिल्डर पुरस्काराने गौरव

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत संस्कार, मूल्ये आणि आत्मविश्वास देत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शिक्षक दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई लिंक टाऊन ऐरोली आणि इनरव्हील क्लब ऑफ ऐरोली यांच्या संयुक्त विद्यमाने 'नेशन बिल्डर अवॉर्ड' पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

यावेळी नवी मुंबईतील विविध शाळांमधील २६ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक विद्यालय,



शाळा क्रमांक १०३, सेक्टर १४, ऐरोली येथे झालेल्या या सोहळ्याला महापौर सुजाता पाटील, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, जिल्हा समन्वयक विनया हेब्बर, रोटरी क्लबचे अध्यक्ष मृगेंद्र भट, सचिव उदय अवसरे, प्रकल्प संचालक लीलाधर पाटील आणि मुख्याध्यापिका ललिता वाणी यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिक्षक म्हणजे केवळ ज्ञान देणारा नव्हे, तर भावी पिढी घडवणारा राष्ट्रनिर्माता या भावनेतून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी राबवलेले नावीन्यपूर्ण उपक्रम, प्रभावी अध्यापन, सामाजिक बांधिलकी व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. यात पालिका शाळांमधील १४, खासगी शाळांमधील १० व दोन विशेष शिक्षकांचा समावेश होता.

प्रारंभी विद्यार्थिनींनी ढोल-ताशा आणि लेझीमच्या गजरात मान्यवरांचे उत्साहपूर्ण स्वागत केले. या पारंपरिक स्वागतामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली, तर शिक्षकांच्या कार्याबद्दलची कृतज्ञता आणि आपुलकीचेही दर्शन घडले. मान्यवरांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप मस्तुद आणि प्रशांत गादेवार यांनी केले. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लब, इनरव्हील क्लब आणि शाळा प्रशासनाचे सहकार्य लाभले.

# उरण तालुक्यात खान्देश महोत्सव २०२६ उत्साहात; गुणवंतांचा सन्मान

**उरण : बातमीदार**

'नाते मातीशी' या भावनेला केंद्रस्थानी ठेवत खान्देश विकास मंडळ, उरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'खान्देश महोत्सव २०२६' विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि स्नेहपूर्ण उपक्रमांनी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. उरण येथील भारती बँक्वेट हॉल, करंजा रोड येथे झालेल्या या कार्यक्रमाला खान्देशी समाजबांधवांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात सत्यनारायण महापूजा, स्नेहमेळावा, सामूहिक भोजन तसेच विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. खान्देशातून सेवामुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा, खान्देशी डॉक्टरांचा तसेच ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करून त्यांच्या योगदानाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाला आमदार महेश बालदी, जेएनपीटीच्या महाव्यवस्थापक मनीषा जाधव, लहास ग्रीन इंडिया प्रा. लि.चे संचालक गुलाबराव जाधव, कल्पना नाईक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर, पनवेल महापालिका प्रभाग समिती 'ब'चे सभापती मधू पाटील, जिल्हा परिषद सदस्या



प्रेरणा घरत, पोलीस निरीक्षक राहुल काटवानी, नगरसेविका मिनाक्षी पाटील, पंचायत समिती सदस्य कैलास भोईर, नवजीवन लोक विकास संस्थेचे अध्यक्ष किशोर पाटील तसेच गाडी लोहार समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष युवराज जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी महाराष्ट्राचे सिंघम म्हणून सुपरिचित असलेले पैलवान तथा न्हावा शेवा पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी व उपनगराध्यक्ष रवी भोईर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान खान्देशी हास्यकलाकार, नकलाकार व निवेदक-अभिनेते विलासकुमार शिरसाठ यांच्या विशेष खान्देशी मनोरंजन कार्यक्रमाने उपस्थितांची करमणूक केली. आयोजनात खान्देश विकास मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चित्ते, कार्याध्यक्ष सुनील चौधरी, सचिव सचिन खैरनार, उपाध्यक्ष आनंद कुमावत, खजिनदार वामनराव राठोड, सदस्य भरत पाटील, महिला सदस्य जयश्री महाजन, सभासद रवींद्र पाटील, दुर्गेश महाले, रवींद्र सूर्यवंशी, ईश्वर माळी, विजय नगराळे, उपाध्यक्ष कैलास भामरे, सल्लागार संजय पाटील, सदस्य संदीप पाटील, महिला सदस्य राजश्री मोरे, सभासद सुनील झोपे, दिनेश पाटील, भगवान राठोड, गोकुळ धाडी व मनोज चव्हाण यांचा सहभाग होता.

# गोवर्धनी माता मंदिरात गोविंदांचा जल्लोष; भव्य थरांची सलामी

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सवाचे औचित्य साधून श्री गोवर्धनी माता मंदिरात गोविंदा पथकांचा उत्साह पाहायला मिळाला. मंदिराच्या जीर्णोद्धार सोहळ्यानंतर नवी मुंबई परिसरातील विविध नामांकित गोविंदा पथकांनी आणि दहीहंडी उत्सव मंडळांनी मंदिरात विशेष हजेरी लावली. बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे आणि निलेश म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंदिरात आलेल्या सर्व गोविंदा पथकांचे पारंपरिक पद्धतीने आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले.

सर्व गोविंदांनी प्रथम गोवर्धनी मातेच्या चरणी नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतले. यानंतर मंदिर परिसरात गोविंदांनी शिस्तबद्ध, सुरक्षित आणि भव्य मानवी मनोरे रचून मातेच्या चरणी थरांची सलामी दिली. गोविंदांच्या या थरारक प्रात्यक्षिकांनी आणि 'गोविंदा गोपाळा'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

यावेळी बोलताना आमदार मंदा म्हात्रे यांनी गोविंदांचा उत्साह वाढवताना म्हटले की, दहीहंडी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीची शान आणि तरुणांच्या एकतेचे प्रतीक आहे. गोवर्धनी मातेच्या आशीर्वादाने सर्व गोविंदांनी सुरक्षितपणे व क्रीडा भावनेने हा उत्सव साजरा करावा. सर्व गोविंदा पथकांना मनापासून शुभेच्छा. यावेळी विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार मंदा म्हात्रे आणि निलेश म्हात्रे यांचे या आयोजनाबद्दल आभार मानले. सोहळ्यामुळे नवी मुंबईतील दहीहंडी उत्सवाचा आनंद द्विगुणित झाला.



# NIEPID खारघरचे घवघवीत यश; नृत्य, संगीत स्पर्धेत प्रथम क्रमांक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांग सक्षमीकरण संस्था, क्षेत्रीय केंद्र नवी मुंबई, खारघर (NIEPID RC NM) या केंद्रीय क्षेत्र संस्थेने नृत्य व संगीत स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत दोन्ही विभागांत प्रथम क्रमांक पटकावला. या दुहेरी यशामुळे NIEPID RC NM खारघरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

इनरव्हील क्लब खारघरच्या वतीने आणि क्लबच्या प्रेसिडेंट स्वाती मॅडम यांच्या पुढाकाराने जिल्हास्तरीय नृत्य व संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नवी मुंबई परिसरातील एकूण आठ विशेष शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला इनरव्हील क्लबचे पदाधिकारी व मान्यवर, विशेष विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक, विशेष शिक्षक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या स्पर्धेत NIEPID RC NM खारघरने नृत्य आणि संगीत या दोन्ही विभागांत प्रथम क्रमांकाची मानाची ट्रॉफी पटकावली. दोन्ही स्पर्धांमध्ये मिळून संस्थेच्या एकूण ३२ विशेष विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नृत्य स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची संपूर्ण तयारी, नृत्याविष्काराची संकल्पना, सराव, मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देण्याची जबाबदारी विशेष शिक्षिका स्मिता निळकंठ यांनी सांभाळली. विशेष विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार नृत्याचे प्रशिक्षण देत त्यांच्यात




आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्यांनी महिनाभर अथक परिश्रम घेतले. त्यांच्या मेहनतीला आणि योग्य मार्गदर्शनाला यश मिळत NIEPID RC NMने नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

त्याचप्रमाणे संगीत शिक्षिका मीना दासमोहपात्रा यांनी विद्यार्थ्यांची संगीताची उत्तम तयारी करून घेतली. विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार सराव घेत त्यांना प्रोत्साहन दिल्यामुळे संगीत स्पर्धेतही NIEPID RC NMला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळाली. या उल्लेखनीय यशाबद्दल NIEPID RC NM नवी मुंबईचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. स्मिता निळकंठ आणि मीना दासमोहपात्रा यांच्या विशेष प्रयत्नांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. विशेष विद्यार्थ्यांना नृत्य आणि संगीताचे प्रशिक्षण देणे निश्चितच आव्हानात्मक कार्य आहे, मात्र योग्य नियोजन, सातत्यपूर्ण सराव, संयम, प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवला, तर ही मुलेही उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, हे या यशातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

दोन्ही स्पर्धांतील प्रथम क्रमांकाचे श्रेय विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य, शिक्षकांचे मार्गदर्शन व NIEPID RC NM खारघरच्या टीमच्या प्रयत्नांना जाते. डॉ. रवी प्रकाश सिंह यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन केले.

# गणेशोत्सवापूर्वी दिघ्यातील रस्ते खड्डेमुक्त करा!

## नगरसेविका अपर्णा गवते यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा विभागातील विविध नगरांतील अंतर्गत रस्ते तसेच ठाणे-बेलापूर रस्ता हा गणपती बाप्पाच्या आगमनापूर्वी खड्डेमुक्त करण्याचे तसेच दिघा येथील गणपती बाप्पा तलावाजवळील पदपथ तातडीने दुरुस्त करण्याची मागणी करणारे निवेदन भाजपच्या नगरसेविका अपर्णा गवते यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना दिले. यावेळी शहर अभियंता शिरीष आरदवाडदेखील उपस्थित होते.

दरम्यान, नगरसेविका अपर्णा गवते यांनी आपल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे दिघा विभागातील विविध नगरांतील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. त्याचप्रमाणे ठाणे-बेलापूर रस्ताही अतिशय खराब झाला असून जागोजागी खड्डे पडल्याने वाहतुकीची समस्या गंभीर झाली असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे.

दिघा येथील गणपती बाप्पा तलावाजवळील पदपथावर काही लोखंडी रॉड बाहेर आले असून त्यामुळे नागरिकांना गंभीर दुखापत होण्याची शक्यता आहे. तरी दिघा विभागातील विविध नगरांतील अंतर्गत रस्ते तसेच ठाणे-बेलापूर रस्ता गणपती बाप्पांच्या आगमनापूर्वी खड्डेमुक्त आणि सुस्थितीत करून येथील जनतेस सहकार्य करावे, अशी विनंती नगरसेविका अपर्णा गवते यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# पेण रेल्वेस्थानकाचा होणार कायापालट

## लोकप्रतिनिधींसोबतच्या बैठकीत रेल्वे प्रशासनाकडून प्रात्यक्षिक सादर

**पेण : प्रतिनिधी**

कोकणातील मध्य रेल्वेचे दुसरे स्थानक असलेले पेण रेल्वेस्थानक अद्ययावत होत असून, येत्या काही दिवसांत आंतरराष्ट्रीय विमानतळासारखे हे स्थानक उभारी घेत आहे. सध्या या रेल्वे स्थानकाची अवस्था दयनीय असल्याचे चित्र आहे. पेण न. पा. आणि पेणमधील प्रवासी यांच्या अनेक वर्षांच्या मागणीची पूर्तता होताना दिसत आहे. सोमवारी दुपारी पेण रेल्वे स्थानकाच्या प्रस्तावीत नूतनीकरणाच्या आणि विकासकामांची खा. सुनील तटकरे यांनी रेल्वे अधिकारी आणि पेण नगरसेवक यांच्या समवेत पेण न.पा.च्या सभागृहात रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रस्तावित रेल्वेस्थानकाचे प्रात्यक्षिक रेल्वे प्रशासनाकडून सादर करण्यात आले.




यावेळी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, सभापती कलावती पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दयानंद भगत, जितेंद्र ठाकूर, यांच्यासह पेण न.प. सभापती, नगरसेवक, रेल्वेचे अधिकारी, राष्ट्रवादी, भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

मध्य रेल्वेवरील पनवेल रेल्वे स्थानकानंतर पेण हे महत्त्वाचे रेल्वे स्थानक आहे. त्यांनी यावेळी पेण रेल्वे स्थानकाचा परिसर अद्यावत होणार असून आंतरराष्ट्रीय विमानतळासारखे हे रेल्वे स्थानक होणार असल्याचे सांगितले. तर या ठिकाणी लांब पल्ल्याच्या गाड्या थांबणे तांत्रिक अडचणी नुसार कठीण असले तरी प्रयत्न केले जातील, मात्र पेण रेल्वे स्थानकात मेमु रेल्वे फेऱ्यांवर जास्तीत जास्त भर दिला जाईल असे आश्वासन खा. तटकरे यांनी उपस्थितांना दिले.

पेण रेल्वे स्थानक अद्यावत होणार असून या ठिकाणी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेले गणेशमुर्ती याचा विचार करून या संकल्पनेवर हे रेल्वे स्थानक विकसित करण्यात येणार आहे. रेल्वेस्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळच गणपती बाप्पाची ओळख म्हणून बाप्पाच्या मूर्तीची उभारणी देखील करण्यात येणार आहे. यासाठी संकल्पना तयार करण्याची संबंधितांना सूचना खासदार सुनील तटकरे यांनी दिल्या.

यावेळी रेल्वे स्थानक कशा पद्धतीचे असणार आहे याचे प्रात्यक्षिक छायाचित्र दाखवण्यात आले. पेण रेल्वे स्थानकाच्या अद्ययावत करण्यामध्ये स्वतंत्र रिक्षा पार्किंग, टू व्हीलर, फोरव्हीलर पार्किंग, पेण रेल्वे स्थानक सुशोभिकरण, प्लॅटफॉर्म सुशोभिकरण, तिकीटघर, स्वागतकक्ष, उद्यान असणार आहे. संपूर्ण रेल्वे स्थानक परिसर अद्ययावत करण्यात येणार आहे. लवकरच या रेल्वे स्थानकाची प्रक्रिया पूर्ण करून निविदा काढण्यात येणार आहे. नोव्हेंबरमध्ये रेल्वे स्थानक सुशोभिकरणाच्या कामाला सुरुवात करण्याचे संकेत खा. तटकरे यांनी व्यक्त केले. यावेळी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी पेण पालिका आणि पेणकर विविध संघटना यांनी रेल्वे बाबत मांडलेल्या समस्यांकडे लक्ष देऊन त्या पूर्णत्वास आणण्यात हातभार लावत आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महायुतीचे उमेदवार खासदार सुनिल तटकरे यांना पेणमधुन पन्नास हजारांचे मताधिक्य देण्याचा शब्द आमदार रवीशेठ पाटील यांनी स्व. अजितदादा पवार यांना दिला होता. त्यांनी तो शब्द पाळल्यानंतर पेण शहराला रस्ते विकासासाठी कोणत्यावधी रुपयांचा निधी देण्यांचा शब्द अजित पवार यांनी रविशेठ पाटील यांना दिला होता.

दोघांनीही एकमेकांचा शब्द पाळल्यानंतर आज अजितदादा पवार आपल्यात नसल्याने त्यांच्या स्मृती जाग्या राहाव्यात याचा विचार करून पेण पालिकेने नूतनीकरण करण्यात येणाऱ्या पालिकेच्या सभागृहाला स्व. अजितदादा पवार यांचे नाव देण्याचा ठराव घेतला आहे आणि त्याची घोषणा आज सभागृहात खा. सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

## नांदगाव विनयभंग प्रकरणातील आरोपींवर कारवाईची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी नांदगाव येथील सुरुळपेठ भागात एका महिलेवर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत आरोपी याने महिलेच्या घरात घुसून विनय भंग केला होता. या बाबत मुरुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु या गुन्ह्यात आवश्यक ती कठोर कलमे न लावल्याने आरोपी त्वरित सुटला होता. याचा प्रचंड राग येथील ग्रामस्थ यांनी व्यक्त केला. यशवंत पाटील व सरपंच शरद खेडेकर यांनी या बाबत तीव्र आक्षेप घेत कठोर कलमे दाखल न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

यावेळी त्यांच्या सोबत मुरुड पोलिस ठाण्यात ग्रामस्थ सुद्धा उपस्थितीत होते. मुरुड पोलिस ठाण्यात आरोपी राजेश ( पप्या ) ठाकूर यांच्यावर बी एन एस ७४ व ३३३ अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला होता. या झालेल्या प्रक्रियेवर जोरदार आक्षेप घेत बी एन एस ३२९ घरात बेकायदेशीर घुसखोरी हे कलम लावणे खूप आवश्यक होते. याला सात वर्ष शिक्षेचे प्रावधान आहे. त्याच प्रमाणे बी एन एस ७५ ,७९,७७ ही कलमे लावली पाहिजे होती. परंतु तसे न करता छोटी कलमे लावून आरोपी यास मोकळीक दिली असल्याचे सांगितले. मुरुड पोलिस ठाण्यात जर कठोर कार्यवाही केली नाही तर आम्ही ग्रामस्थांना सोबत घेऊन जनादोलन छेडू असा इशारा यावेळी त्यांनी दिला.

याबाबत मुरुड पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी सांगितले की, मुरुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होताच आरोपी याला अटक करून ताब्यात घेण्यात आले आहे. पीडित महिलेने जे सांगितले त्यानुसार एफ आर आय दाखल करण्यात आला आहे. सदरच्या तक्रारीची प्रत अलिबाग येथील सरकारी वकील यांना पाठवून त्यांचे सुद्धा मार्गदर्शन घेण्यात आले आहे. दाखल असलेल्या कलमांपैकी बी एन एस ७६ सुद्धा दाखल करण्यात आले आहे. आम्ही योग्य ती कारवाई केली असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# लोणेरे विद्यापीठात विद्यार्थी परिचय कार्यक्रम; मान्यवरांकडून मार्गदर्शन

**माणगाव : बातमीदार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथील विज्ञान, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्र विभागाच्या वतीने नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष बी.टेक. अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘विद्यार्थी परिचय कार्यक्रम २०२६’ ची सुरुवात शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी विद्यापीठाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रथम वर्ष समन्वयक तथा भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संगीता जी. दाहोत्रे, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. बी. लोखंडे आणि यांत्रिक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एच. एस. जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. एन. जाधव यांनी केले.या कार्यक्रमास नव्याने प्रवेश घेतलेले विद्यार्थी तसेच त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थी व पालक मिळून सुमारे ३०० जणांची उपस्थिती होती.

यावेळी एमेरिटस प्राध्यापक प्रा. डॉ. एस. एल. नलबलवार यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची रचना, शैक्षणिक कार्यपद्धती, उपलब्ध सुविधा तसेच विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध संधींची माहिती दिली. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP २०२०) मधील महत्त्वपूर्ण तरतुदी, कौशल्याधिष्ठित शिक्षण, बहुविषयक शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कुलसचिव तथा अधिष्ठाता (संशोधन व विकास) डॉ. सचिन एम. पोरे यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना संबोधित केले. विद्यापीठातील शैक्षणिक, संशोधनात्मक व सहशैक्षणिक संधींचा विद्यार्थ्यांनी योग्य उपयोग करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक व व्यावसायिक भविष्यासाठी त्यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

नव्याने विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाची कार्यपद्धती, शैक्षणिक वातावरण, उपलब्ध सुविधा तसेच NEP २०२० अंतर्गत असलेल्या संधींची ओळख करून देण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरला.




## दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले श्री हरिहरेश्वर मंदिर

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले श्रीहरीहरेश्वर व काळभैरव, योगेश्वरी मंदिर भाविकांच्या श्रद्धेचे ठिकाण मानले जाते. आज शेवटचा व चौथा श्रावणी सोमवार असल्यामुळे या ठिकाणी दर्शनासाठी भक्तांची अलोट गर्दी उसळली होती. हरिहरेश्वर मंदिर हे समुद्रकिनाऱ्याला लागूनच असल्याने या ठिकाणचा निसर्ग प्रचंड प्रसन्न वातावरण निर्माण करतो. ज्याप्रमाणे काशी त्रंबकेश्वर किंवा अन्य महादेवाची ठिकाणे असलेल्या जागी, ज्याप्रमाणे उत्तरविधी, श्राद्ध कर्मे, त्याचप्रमाणे अस्थि विसर्जन करण्यात येते. तसेच नारायण नागबळी, कालसर्प शांत, त्रिपिंडी शांत इत्यादी विधी देखील या ठिकाणी करण्यात येतात. स्कंद पुराणातील माहितीनुसार अगस्ती मुनींनी खूप मोठी तपश्चर्या केल्यानंतर त्यांच्या इच्छेप्रमाणे या ठिकाणी हरिहरेश्वरचे लिंग प्रकट झाले.

या ठिकाणी दुसरे मंदिर कालभैरवाचे आहे. शतघ्न राक्षसाचा वध करण्यासाठी काळभैरवाने अवतार घेतला. याच ठिकाणी पिशाच्च बाधा देखील दूर केली जाते. बाजूलाच आदिशक्ती काळेश्वरी देवीची देखील मूर्ती या मंदिरात आहे. या ठिकाणी दर्शन घेताना प्रथम काळभैरवाचे दर्शन घ्यावे, त्यानंतर हरिहरेश्वरच्या मंदिरात जाऊन गणपती, गरुड, नंदी, यांचे दर्शन घेतल्यानंतर हरिहरेश्वरचे दर्शन घ्यावे अशी प्रथा आहे.

हरिहरेश्वरचे दर्शन झाल्यानंतर पुन्हा काळभैरवाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घालावी. कारण ही प्रदक्षिणा सोमसुत्री असल्याचे मानले जाते. मूळचे श्रीवर्धन तालुक्यातील असलेले भट कुटुंबीय यांना श्रीवर्धन परिसराची देशमुखी मिळाली होती. त्यानंतर ते पुण्यात गेले व त्यांना मराठीशाहीच्या पेशवे पदी नेमणूक करण्यात आली. या सर्व (भट) पेशवे कुटुंबियांचे कुलदैवत श्रीहरिहरेश्वर देवस्थानच आहे. पेशवे कुटुंबीयांकडून पूर्वी दर साल ११५२ मंदिर खर्चासाठी येत असत. परंतु आता महाराष्ट्र शासनाने याच्यामध्ये वाढ केली आहे. पेशव्यांची या ठिकाणची सर्व पूजेची कामे उपाध्ये करतात.

मंदिर समुद्रकिनारी असल्यामुळे या ठिकाणी पर्यटक देखील खूप मोठ्या प्रमाणावर येतात. येणारे पर्यटक व महिला पर्यटक यांच्याकडून मंदिराचे पावित्र्य बिघडवण्याचे काम होत असते. कारण हे पर्यटक अत्यंत तोकडे कपडे घालून मंदिरात येण्याची इच्छा व्यक्त करतात. विश्वस्त मंडळाने आता त्यांना पूर्ण कपड्यांमध्येच मंदिरात प्रवेश दिला जाईल अशा प्रकारे सूचना जारी केली आहे. जेणेकरून मंदिराचे पावित्र्य राखले जाईल.दक्षिणेकडील सर्व हिंदू मंदिरांमध्ये पुरुषांना पांढरे वस्त्र, महिलांना पूर्ण आणि सोज्वळ कपडे घालून प्रवेश दिला जातो.हीच खरी हिंदू धर्माची संस्कृती आहे.



## श्रीवर्धन येथे रंगली नृत्यस्पर्धा; महिलांचा सहभाग, नृत्यरंग ग्रुप प्रथम

**श्रीवर्धन : बातमीदार**

रायगडचे खासदार सुनील तटकरे,महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून श्रीवर्धन येथे राष्ट्रवादी महिला काँग्रेसतर्फे श्रावण सरी या नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेमध्ये श्रीवर्धन तालुक्यातील एकूण सात ग्रुपनी सामूहिक नृत्य स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत ग्रामीण भागातील मेघरे महिला मंडळ व गुळधे महिला मंडळ यांनी देखील सहभाग घेतला होता. सर्वच स्पर्धकांनी उत्तम प्रकारे नृत्य सादर केली. प्रथम क्रमांक मिळालेल्या नृत्यरंग डान्स ग्रुपने सादर केलेल्या डान्स मधून वृक्षतोड करू नका. जंगली प्राण्यांची हत्या करू नका. अशा प्रकारचा संदेश देण्यात आला. सदरची संकल्पना पल्लवी साठे यांची होती. तर नृत्यदिग्दर्शन स्नेहा चौकर हिने केले होते. सर्व स्पर्धकांची रंगभूषा प्रसिद्ध मूर्तिकार गणेश बंदरकर यांनी केली होती. परीक्षक म्हणून विजय यादव लोणेरे, माणगाव उपस्थित होते.

द्वितीय क्रमांक श्रीवर्धन कोंड येथील स्वामी समर्थ डान्स ग्रुपला , तृतीय क्रमांक नारी शक्ती ग्रुप श्रीवर्धन कसबा पेठ यांना मिळाला. तर प्रथम उत्तेजनार्थ पुरस्कार श्रीवर्धन नवी पेठ येथील नवदुर्गा डान्स ग्रुपला, द्वितीय उत्तेजनार्थ पुरस्कार भोस्ते येथील विश्वकर्मा डान्स ग्रुप यांना मिळाला.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सबाह फिरफिरे, शहर अध्यक्षा व स्वीकृत नगरसेविका रुची बोरकर यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी नगरसेविका साक्षी पाब्रेकर, शिवानी चौले, शमा पोरनाक, राजसी मुरकर, प्रगती वाघे, प्रविता माने, भाजप नगरसेविका सुप्रिया चोगले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

## पोलादपूरच्या गोळेगणीतील ले. कर्नल किशोर मोरे यांना योद्धा सेवा सन्मान पुरस्कार प्रदान

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील गोळेगणी गावातील सेवानिवृत्त लेफ्टनंट कर्नल किशोर महादेव मोरे यांना त्यांच्या देशसेवेबद्दल चीफ ऑफ आर्मी स्टाफ अर्थात स्थलसेनाप्रमुख जनरल धीरज सेठ यांच्याहस्ते दिल्लीमध्ये 'योद्धा सेवा सन्मान' पुरस्कार प्रदान करण्यात आला. तब्बल ३७ वर्षे देशसेवा करुन गावाकडे परतलेले लेफ्टनंट कर्नल किशोर मोरे स्वतःच्या सेवानिवृत्तीनंतर सेवानिवृत्त सैनिकांच्या कल्याणासाठी सतत प्रयत्नशील असतात.



लेफ्टनंट कर्नल किशोर मोरे आपले वडील सुभेदार महादेव बाजीराव मोरे यांच्या पावलावर पाऊल ठेवून सैन्यात दाखल झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत एका सामान्य सैनिकापासून त्या लेफ्टनंट कर्नल पदापर्यंत पदोन्नती घेतली. ३७ वर्षांच्या सेवाकाळात किशोर मोरे यांनी जम्मू आणि काश्मीर, अरुणाचल प्रदेश, नागालँड सारख्या दूर्गम पर्वतीय क्षेत्रात आपले कर्तव्य बजावले. याकाळात पाकिस्तान तसेच चीनच्या सीमेवर तैनात असताना विविध लष्करी मोहिमांमध्ये सहभागी झाले. सेवाकार्याच्या उत्तरार्धात गुवाहाटी, सिकंदराबाद, कोल्हापूर येथे एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर म्हणून कार्य केले. या काळात विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्याशी सातत्याने संवाद साधत शिक्षण, शिस्त, नेतृत्वगुण आणि चारित्र्य निर्मिती याचे महत्त्व अधोरेखित करण्याचे त्यांनी कार्य केले. सेवानिवृत्तीनंतर सुद्धा त्यांनी समाजसेवा, राष्ट्र निर्माणाची आपली बांधिलकी कायम ठेवली. मोरे यांनी आजमितीस २६ तरुणांना सशस्त्र दलात अधिकारी होण्यासाठी यशस्वी मार्गदर्शन केले आहे. त्यानंतर पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी या मूळगावी ते सध्या स्थायिक झाले आहेत.

महाड येथे युआरसी इएसएम स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. त्याचमुळे महाड पोलादपूर यासह रायगड जिल्ह्यातील इतर दुर्गम भागातील माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांना आवश्यक त्या सीएसडी कॅन्टीन सुविधा उपलब्ध झाल्या. रायगड जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या आर्मी सीएसडी कॅन्टीन महाडमध्ये सुरू करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सध्या ते महाड तथा चिपळूण आर्मी सीएसडी कॅन्टीनचे व्यवस्थापक म्हणून कार्यरत असून माजी सैनिक त्यांच्या कुटुंबियांच्या पेन्शन तसेच सैनिकांच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असतात. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी महाविद्यालयीन व एनसीसीच्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी व्याख्यान तसेच सैन्य दलात भरती संदर्भात तरुणांना मार्गदर्शनाचे कार्य सातत्याने सुरू ठेवले आहे.

## श्री समर्थ फाउंडेशनतर्फे आदर्श मातांचा गौरव

**अलिबाग : प्रतिनिधी**

मातृत्व, कर्तृत्व आणि सामाजिक योगदानाचा गौरव करणारा ‘आदर्श माता पुरस्कार’ तसेच ‘स्मृति दर्पण’ काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा श्री समर्थ विचार फाउंडेशन रायगडच्या वतीने अलिबाग येथील सन्मान हॉटेलमध्ये उत्साहात पार पडला. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १५ मातांचा मान्यवरांच्या हस्ते ‘आदर्श माता गौरव पुरस्कार’ देऊन सन्मान करण्यात आला.

आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपनगराध्यक्ष अँड. मानसी म्हात्रे, आदर्श बँकेचे संस्थापक सुरेश पाटील, अँड. प्रवीण ठाकूर, जिल्हा परिषद सदस्य अमित नाईक, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, नगरसेवक अँड. अंकित बंगेरा, डॉ. संदेश पाटील आणि श्री समर्थ विचार फाउंडेशनचे अध्यक्ष अँड. रत्नाकर पाटील यांच्या हस्ते ‘स्मृति दर्पण’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

सुनिता नाईक, मालती ठाकूर, पार्वती पाटील, महानंदा वर्तक, अनिता नाईक, गुलाब गायकवाड, आशाबाई म्हात्रे, ललिता बंगेरा, सुचेता पाटील, शारदा पाटील, इंदिरा भगत, सुलोचना पाटील, मनोरमा पाटील, इंदुमती पाटील आणि उर्मिला ठाकूर विविध क्षेत्रांत कार्यरत मातांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



# ईशान किशनचा झंझावात!

## दुलीप ट्रॉफी फायनलमध्ये ठोकले दणदणीत द्विशतक

**चेन्नई : वृत्तसंस्था**

दुलीप ट्रॉफीमध्ये ईस्ट झोनचा कर्णधार ईशान किशनने २५ चौकार व दोन षटकारांसह दणदणीत द्विशतकी खेळी साकारली. त्याचे हे दुसरे प्रथम श्रेणी शतक ठरले. ईशानच्या नेतृत्वाखालील ईस्ट झोन संघाने पहिल्या डावात ७०८ धावांचा डोंगर उभारला आहे.

दुलीप ट्रॉफी २०२६मधील अंतिम फेरीचा सामना ईस्ट झोन आणि वेस्ट झोन यांच्यात खेळवला जात आहे. चेन्नईच्या चेपॉक स्टेडियममध्ये हा सामना पाहण्यासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली आहे. या सामन्यात ईशान किशनने १९९ धावांवर असताना शानदार चौकार लगावत आपले शतक पूर्ण केले. शतकी खेळी साकारल्यानंतर त्याने हेल्मेट काढून बॅट उंचावत ड्रेसिंग रूमच्या दिशेने इशारा केला. ड्रेसिंग रूममध्येही सर्व जण उभे राहून टाळ्या वाजवत त्याचे कौतुक करताना दिसले.



पहिल्याच दिवशी ईस्ट झोनच्या फलंदाजांनी ३००हून अधिक धावा उभारून आपले वर्चस्व सिद्ध केले होते. या शानदार फलंदाजीमध्ये ईशान किशनने सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना कर्णधारपदाला साजेसी खेळी साकारत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ईशानने अवघ्या ७१ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीतील हे २०वे अर्धशतक होते. या खेळीदरम्यान त्याने प्रथम श्रेणी कारकिर्दीत चार हजार धावांचा महत्त्वपूर्ण टप्पाही गाठला.

ईशानने अर्धशतकाचे रूपांतर शतकात आणि शतकाचे द्विशतकात केले. २७० धावा करून बाद होत तो तंबूत परतला. यापूर्वी ईशानने २०१६मध्ये दिल्लीविरुद्ध २७३ धावांची खेळी केली होती. आतापर्यंत त्याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये १० शतके केली आहेत. हे द्विशतक विशेष महत्त्वाचे आहे, कारण दुलीप करंडकाच्या अंतिम सामन्यात द्विशतक झळकावणारा 'ईस्ट झोन'चा तो पहिलाच फलंदाज ठरला.

### सातत्यपूर्ण कामगिरी

गेल्या दोन वर्षांत ईशान किशनने महत्त्वाच्या प्रसंगी सातत्याने स्वतःला सिद्ध केले आहे. त्याने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात शानदार अर्धशतक झळकावले आणि सय्यद मुश्ताक अली करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात शतकी खेळी साकारत झारखंडला विजेतेपद मिळवून दिले. आता त्याने दुलीप करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातही अशीच कामगिरी करून दाखवली आहे.

# महिला हॉकी आशिया कपमध्ये भारताचा सलग दुसरा विजय

**मोकी : वृत्तसंस्था**

भारताच्या ज्युनियर महिला हॉकी संघाने दुसऱ्या एलिट पूल सामन्यात मलेशियाला ११-१ने पराभूत करत एएचएफ ज्युनियर आशिया कप २०२६मधील आपली विजयी मालिका कायम ठेवली. भारतीय संघ आता ८ सप्टेंबर रोजी तिसऱ्या पूल सामन्यात जपानचा सामना करेल.

पहिल्या सामन्यात दक्षिण कोरियाला ४-१ने हरवल्यानंतर दोन वेळच्या विजेत्या आणि गतविजेत्या संघाने या सामन्यात अधिक आत्मविश्वास आणि समन्वय दाखवला. भारतासाठी सात वेगवेगळ्या खेळाडूंनी गोल केले. भारतीय खेळाडूंनी जोरदार आक्रमण केले आणि पेनल्टी कॉर्नरचा प्रभावीपणे वापर केला.

सामन्याच्या पहिल्याच मिनिटात भारताने गोल करून खाते उघडले. पूजा साहूने पेनल्टी स्ट्रोकचे गोलमध्ये रूपांतर करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. चौथ्या मिनिटात पूर्णिमा यादवने आघाडी २-० अशी वाढवली.



त्यानंतर आठव्या मिनिटात बिनिमा धनने गोल केला, तर १४व्या मिनिटात कृष्णा शर्माने भारताची आघाडी ४-० अशी वाढवली. दुसऱ्या क्वार्टरमध्येही भारताने आपले वर्चस्व कायम ठेवले. पूर्णिमा यादवने १७व्या मिनिटाला आपला दुसरा गोल केला. त्यानंतर २१व्या मिनिटाला सुखवीर कौरने आणि २८व्या मिनिटाला गीता यादवने गोल केले. मध्यंतरापर्यंत भारताने ७-० अशी आघाडी घेतली होती.

तिसऱ्या क्वार्टरमध्ये मलेशियाने ३८व्या मिनिटाला नूर मोहम्मदच्या माध्यमातून आपला एकमेव गोल केला. ४२व्या मिनिटाला भारताला आणखी एक पेनल्टी स्ट्रोक मिळाला, ज्याचे पूजा साहूने यशस्वीपणे गोलमध्ये रूपांतर करून आपला दुसरा गोल केला. पुढच्याच मिनिटाला सानिका चंद्रकांत मानेने गोल करून भारताची आघाडी ९-१ अशी वाढवली. शेवटच्या क्वार्टरमध्येही भारताने आपला आक्रमक खेळ सुरू ठेवला. गीता यादवने ५३व्या मिनिटाला आपला दुसरा गोल केला. त्यानंतर सानिकाने ५८व्या मिनिटाला आणखी एक गोल करून भारताची आघाडी ११-१ अशी वाढवली.

### गुणतालिकेत अव्वल

या विजयासह भारताने आपले दोन्ही सामने जिंकले असून सहा गुण मिळवत एलिट पूलच्या गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. चीन आणि जपान प्रत्येकी तीन गुणांसह अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. त्यांची स्थाने गोल फरकाने ठरवली जातात. दक्षिण कोरिया आणि मलेशिया प्रत्येकी दोन पराभवांसह अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या स्थानावर आहेत.

# शफालीला चिडवणाऱ्या फातिमाला आयसीसीने ठोठावला दंड

**दुबई : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेमध्ये झालेल्या सामन्यात पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने शफाली वर्माला दिलेला सेंडऑफ तिला चांगलात महागात पडला असून तिच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

भारत-पाकिस्तान महिला आशिया चषक सामन्यात भारतीय सलामीवीर शफाली वर्माला बाद केल्यानंतर केलेल्या आक्रमक सेलिब्रेशनसाठी पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनावर कारवाई करण्यात आली आहे. दुबईत शनिवारी झालेल्या या सामन्यातील प्रकारासाठी सनाला तिच्या मॅच फीच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला असून तिच्या खात्यात एक डिमेरिट पॉइंटही जोडण्यात आला आहे.

फातिमा सनाने शफालीला बाद केल्यानंतर सेलिब्रेशन करताना तिला पॅव्हिलियनमध्ये परत जाण्याचा इशारा केला होता. मैदानी पंच निमाली परेरा आणि शथिरा जाकीर जेसी, तिसरे पंच रोकेया सुलताना आणि चौथे पंच रबाब अहसान यांनी या प्रकाराबद्दल फातिमा सनावर कारवाई केली. सामनाधिकारी सुप्रिया राणी दास यांच्यासोबत झालेल्या सुनावणीदरम्यान फातिमाने आपली चूक मान्य केली. या सामन्यात भारताने पाकिस्तानवर एकतर्फी विजयाची नोंद केली होती.

# अमेरिकन ओपनमध्ये प्रमुख टेनिसपटूंचा पराभव

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अमेरिकन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेची तिसरी फेरी टेलर फ्रिट्झ, फ्लाविओ कोबोली, मेडिसन कीज या प्रमुख टेनिसपटूंच्या पराभवामुळे धक्कादायक ठरली. यातही मेडिसन कीजचा पराभव चटका लावणारा ठरला.

बिगरमानांकित किनवेन झेंग हिने दोन तास २८ मिनिटांच्या झुंजीनंतर अक्षरशः विजयाचा घास मेडिसनच्या तोंडून हिरावून घेतला. त्याचवेळी महिला एकेरीत कोको गॉफ, इगा श्वीऑटेक, मीरा आंद्रिवा तर, पुरुष एकेरीत ॲलेक्झांडेर झ्वेरेव यांनी सहज विजय मिळवून चौथ्या फेरीत प्रवेश केला.

५-० अशा आघाडीनंतर मॅच पॉइंटवर असताना अनपेक्षितपणे कीजचे सामन्यावरील नियंत्रण सुटले आणि तिला पराभवाचा सामना करावा लागला.

### झेंगची मेडिसनवर मात



झेंग हिने अखेरच्या निर्णायक सेटमध्ये सलग सात गेम जिंकून लढत १-६, ७-६ (७-३), ७-५ अशी जिंकली. हा सामना दोन तास २८ मिनिटे चालला.

महिला एकेरीत कोको गॉफ हिने क्रिस्तिना बुक्सा हिचा ६-३, ६-४ असा पराभव केला. जोविचने फिलिपाईन्सच्या ॲलेक्स ईला हिचा ७-५, ३-६, ७-५ असा पराभव केला. तेराव्या मानांकित नाओमी ओसाका हिने एलिस मर्टेन्सवर ६-३, ३-६, ७-५ असा विजय मिळविला. निर्णायक सेटमध्ये ओसाका २-४ अशी पिछाडीवर होती. त्यानंतर पुनरागमन करत तिने विजयावर शिक्कामोर्तब केले.

पुरुष दुहेरीत भारताच्या युकी भाम्ब्री आणि अनिरुद्ध चंद्रशेखर यांना पहिल्याच फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. अमेरिकेच्या रायन सेगेर्मन आणि प्रतिक त्राक जोडीकडून न्यूझीलंडचा मायकेल व्हिनस आणि युकी जोडीला ७-६ (७-४), ७-६ (७-३) असा पराभव पत्करावा लागला. अनिरुद्धने बेलारुसच्या इव्हान लिउतारेविचच्या साथीत जोडी जमवली होती. ब्रिटनच्या आर्थर फेरी आणि जोशुआ पॅरिस जोडीने त्यांना ६-४, ५-७, ६-४ असे हरवले.

### पुरुष एकेरीत झ्वेरेवची चमक

पहिल्या दोन फेरीत विजय मिळविण्यासाठी तब्बल साडेनऊ तास खर्ची करणाऱ्या जर्मनीच्या ॲलेक्झांडर झ्वेरेवने तिसऱ्या फेरीत अलहान्ड्रो ताबिलो याचा ६-२, ७-६ (७-२), ६-२ असा सरळ तीन सेटमध्ये पराभव केला. आर्थर ॲश कोर्टवर नवव्या मानांकित टेलर फ्रिट्झला दोन सेट जिंकल्यानंतरही अर्जेंटिनाच्या फ्रान्सिस्को सेरुन्डोलोकडून ३-६, ४-६, ६-३, ६-४, ६-४ असा पराभव पत्करावा लागला.

# द. आफ्रिका दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलियाचा संघ जाहीर

**सिडनी : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलियाचा संघ जाहीर करण्यात आला आहे. सँड पेपर प्रकरणानंतर आठ वर्षांनंतर 'कांगारू' द. आफ्रिकेत जाऊन खेळतील.

ऑस्ट्रेलियाच्या संघात धावांसाठी झगडणाऱ्या मार्नस लबूशेनला संघात स्थान देण्यात आले आहे. सँडपेपर गेट प्रकरणाचा भाग असलेले स्टीव्हन स्मिथ, पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड आणि नॅथन लॉयन ही चौकडी संघात आहे. मॅट रेनशॉ सलामीवीराच्या भूमिकेत असेल. कूपर कॉनली, मायकेल नेसर आणि मॅथ्यू कुन्हेमन यांचाही समावेश करण्यात आला आहे. जोश इंगलिस आणि स्कॉट बोलँड हे अनुक्रमे राखीव फलंदाज आणि राखीव गोलंदाज असतील. दोन्ही संघांमध्ये प्रत्येकी तीन एकदिवसीय आणि कसोटी सामने खेळले जाणार आहेत.

# पीसीबीला संघाकडून कोणत्याही अपेक्षा नाहीत!

**कराची : वृत्तसंस्था**

पाकिस्तानी संघाच्या सातत्यपूर्ण खराब कामगिरीनंतर इंग्लंडविरूद्ध कसोटीतही तीच स्थिती दिसली. तीन सामन्यांची कसोटी मालिका संपण्याआधीच पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) संघाच्या व्यवस्थापनात आणि खेळाडूंच्या गटात महत्त्वाचे बदल करण्यास सुरुवात केली आहे. यादरम्यान संघाची कामगिरी पाहून शोएब अख्तरने वाभाडे काढले आहेत.

खराब कामगिरीनंतर पाकिस्तानी राष्ट्रीय संघाच्या रचनेत मोठी उलथापालथ झाली आहे. सात खेळाडूंना संघातून वगळून मायदेशी धाडण्यात आले आहे. याशिवाय कसोटी संघाचे प्रशिक्षक सरफराज अहमद आणि गोलंदाजी प्रशिक्षक उमर गुल यांना हटविले आहे. यानंतर पाकिस्तानच्या निवड समितीचे प्रमुख मिसबाह उल हक यांनीही पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर माइक हेसन यांनी संघाची सूत्रे हाती घेतली असून ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज ॲश्ली नॉफ्के सहाय्यक प्रशिक्षक म्हणून त्यांच्या सोबत काम करणार आहे.

### शोएब अख्तरचा संताप; मात्र तीन खेळाडूंची केली पाठराखण



पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरने या मोठ्या बदलांवर आपले मत व्यक्त केले आहे. त्याच्या मते, पीसीबीचा सध्याच्या संघातील खेळाडूंवर विश्वासच राहिलेला नाही, त्यामुळे बोर्डाने हे कठोर निर्णय घेतल्याचे दिसत आहे. 'आऊटसाईड एज' या शोमध्ये बोलताना अख्तरने सांगितले की, इंग्लंडविरुद्धच्या पराभवांवर केवळ प्रतिक्रिया देण्याऐवजी पीसीबी या दौऱ्याचा उपयोग पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठ्या पुनर्बांधणी प्रक्रियेला वेग देण्यासाठी करत आहे.

अख्तर म्हणाला, पीसीबी या खेळाडूंमुळे स्वतः खूप निराश झाले आहे आणि त्यांना आता या पाकिस्तान संघाकडून कोणत्याही मोठ्या अपेक्षा नाहीत. सध्याचा संघ बाजूला करून त्याच्या जागी युवा आणि नव्या खेळाडूंना संधी देण्याची योजना आहे. पाकिस्तानकडून खेळण्याची खरोखर इच्छा असलेल्या खेळाडूंना पुढे आणले जाईल. ते आता भविष्याकडे पाहत आहेत आणि योग्य दिशेने काम करत आहेत.

पाकिस्तान संघात एवढे मोठे बदल करताना सावधपणे पुढे जाणे गरजेचे असल्याचेही अख्तरने स्पष्ट केले. तो म्हणाला, या बदलाच्या काळात मला फक्त शाहीन शाह आफ्रिदी, नसीम शाह आणि हारिस रौफ यांच्या कारकिर्दीवर परिणाम होऊ नये, एवढेच वाटते. हे तिन्ही खेळाडू अजून बरेच क्रिकेट खेळू शकतात.

# अर्शदीप-समरीन यांनी दिली प्रेमाची कबुली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघातील स्टार वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग आणि त्याची गर्लफ्रेंड, अभिनेत्री व मॉडेल समरीन कौर पुन्हा एकदा त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आले आहेत. त्यांनी आपल्या प्रेमाची कबुली देत आणि नात्याला अधिक घट्ट करत एकमेकांच्या नावाचे विशेष टॅटू हातावर कोरले आहेत. या टॅटूचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून चाहत्यांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

या टॅटूचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही कलाकारांनी एकमेकांच्या हाताच्या लिखावटीत ही अक्षरे कोरून घेतली आहेत. अर्शदीप सिंहने आपल्या हातावर समरीन कौरच्या नावाचे 'एसके' हे अध्यक्षर कोरले आहे, जे स्वतः समरीनच्या हस्ताक्षरात आहे. तर दुसरीकडे समरीन कौरने तिच्या हातावर अर्शदीपच्या नावाचे 'एएस' हे अध्याक्षर अर्शदीपच्या हस्ताक्षरात बनवून घेतले आहे. या दोन्ही टॅटूबरोबर एक छोटेसे लाल रंगाचे क्यूट हार्टदेखील डिझाइन करण्यात आले आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार बंगळुरू येथील 'एलियन्स टॅटू' स्टुडिओमध्ये त्यांनी हा टॅटू तयार करून घेतला.

### एकमेकांच्या नावाचे टॅटू व्हायरल



समरीन कौर ही पंजाबी चित्रपट आणि मॉडेलिंग जगतातील एक प्रसिद्ध चेहरा आहे. तिने २०१८मध्ये फेमिना मिस इंडिया स्पर्धेत जम्मू-कश्मीरचे प्रतिनिधित्व केले होते आणि ती स्टेट फायनलिस्ट राहिली होती. समरीनने चित्रपट, वेब सीरिजमध्ये काम केले आहे.

### सोशल मीडियावर नात्याची चर्चा

*आयपीएल २०२६दरम्यान अर्शदीप आणि समरीनच्या डेटिंगच्या बातम्या समोर आल्या होत्या. त्यानंतर अर्शदीपने इन्स्टाग्रामवर समरीनसोबतचा फोटो शेअर करत 'माय पर्सन' असे कॅप्शन देऊन आपल्या नात्यावर अधिकृत मुहर लावली होती. योगायोगाने सोमवारी (दि.७) समरीन कौरचा वाढदिवस आणि याच दिवशी या टॅटूचे फोटो इंटरनेटवर तुफान व्हायरल होत आहेत.*

# रिंकू, भुवीच्या कामगिरीने रैना प्रभावित

**लखनऊ : वृत्तसंस्था**

यूपी टी-२० लीगने भारतीय क्रिकेटमधील दिग्गजांचेही लक्ष वेधून घेतले आहे. या स्पर्धेत रिंकू सिंहचे नेतृत्व आणि भुवनेश्वर कुमारच्या गोलंदाजीतील कर्तृत्वाने भारताचा माजी अष्टपैलू क्रिकेटपटू सुरेश रैना चांगलाच प्रभावित झाला आहे. त्याने या दोन्ही खेळाडूंबाबत मोठे वक्तव्य केले आहे.



सुरेश रैनाने शाहरूख खानच्या सहमालकीच्या कोलकाता नाईट रायडर्सला (केकेआर) रिंकू सिंहकडे संघाचं नेतृत्व सोपवण्याचा सल्ला दिला आहे. रिंकू हा मेरठ मॅव्हरिक्सचा कर्णधार आहे. "घरातच सिंह असताना बाहेरून कुणाला आणण्याची गरज नाही," असे म्हणत रैनाने आयपीएलमध्ये नेतृत्वासाठी रिंकू हा सर्वोत्तम पर्याय असल्याचे म्हटले आहे. दुसरीकडे लखनऊ फाल्कन्सकडून भुवनेश्वर कुमारच्या शानदार गोलंदाजीचे कौतुक करत रैनाने या भारतीय वेगवान गोलंदाजाला २०२७ वनडे वर्ल्डकपसाठी भारतीय संघाच्या दावेदारांमध्ये स्थान द्यावे, अशी मागणी केली.

रैनाने म्हटले, यूपी टी-२० लीगमध्ये रिंकू सिंहने कमालीच्या कामगिरीसह नेतृत्वाची झलक दाखवली. एखादा खेळाडू आपल्या संघाला सलग चार वेळा यूपी टी-२० लीगच्या फायनलमध्ये पोहचवत असेल, तर त्याच्यात काहीतरी खास नक्कीच आहे. केकेआरने आता रिंकूकडेच संघाचे नेतृत्व सोपवायला हवे.

भुवनेश्वरच्या अनुभवाचे कौतुक करताना रैना म्हणाला, यूपी टी-२० लीगमध्ये भुवीने ज्या पद्धतीने प्रत्येक सामना खेळला, त्यावरून तो आता अधिक परिपक्व अनुभवी आहे हे सिद्ध झाला आहे. २०२७ वर्ल्डकपमध्ये दक्षिण आफ्रिकेच्या खेळपट्ट्यांवर मिळणारा अतिरिक्त बाऊन्स आणि नव्या चेंडूवरील स्विंगच्या जोरावर भुवी टीम इंडियासाठी हुकमी एक्का ठरू शकतो.

# वर्ल्डकपमध्ये भारताला हरवले अन् पाकिस्तान क्रिकेट बरबाद झाले!

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

२०२१च्या टी-२० विश्वचषकात भारताला हरवल्यानंतर खेळाडूंची वृत्ती बिघडली, त्यामुळेच आज पाकिस्तान क्रिकेट रसातळाला गेले, असा दावा मोहम्मद युसूफ यांनी केला.

पाकिस्तान क्रिकेट संघाच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील सातत्यपूर्ण अपयशाचे मूळ २०२१च्या टी-२० विश्वचषकातील भारतावरील विजयात दडलेले आहे, असा थेट आणि खळबळजनक दावा पाकिस्तानचा माजी फलंदाज मोहम्मद युसूफ याने केला आहे. त्या एका विजयानंतर खेळाडूंच्या डोक्यात हवा गेली, नम्रता संपली आणि कर्णधारपदासाठी अंतर्गत गटबाजी सुरू झाली, ज्याचे गंभीर परिणाम आज संपूर्ण पाकिस्तानी क्रिकेट भोगत आहे, असे युसूफ याने नमूद केले.

### माजी दिग्गजाचा दावा



२०२१ च्या टी-२० विश्वचषकात पाकिस्तानने भारताचा १० विकेट्सने पराभव केला होता. विश्वचषकाच्या इतिहासात पाकिस्तानचा भारतावरचा हा पहिलाच विजय ठरला होता. बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांच्या अर्धशतकांच्या जोरावर मिळालेल्या या विजयाचा पाकिस्तानात मोठा जल्लोष झाला होता, मात्र याच विजयाने खेळाडूंची मानसिकता पूर्णपणे बिघडवली, असे युसूफ यांचे मत आहे.

'समा टीव्ही'वरील चर्चेदरम्यान युसूफ म्हणाले, २०२१मध्ये भाराताविरुद्ध मिळालेल्या त्या विजयाने आमचे सर्वाधिक नुकसान केले. खेळाडूंना आपण फार मोठे यश मिळवल्याचा भास झाला. पुढे काय करायचे हेच त्यांना समजेनासे झाले. जेव्हा तुम्ही चांगली कामगिरी करता, तेव्हा पाय जमिनीवर असायला हवेत. कॉलर उडवून उद्धट वर्तन केले की समस्या सुरू होतात आणि पाकिस्तानमध्ये नेमके हेच घडले.

ड्रेसिंग रूममधील परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी म्हटले, संघातील प्रत्येक खेळाडू कर्णधार बनण्याच्या मागे लागला होता. स्वतःच्या कामगिरीची जबाबदारी घ्यायला कोणीही तयार नव्हते. गेल्या चार-पाच वर्षांतील वनडे विश्वचषक, टी-२० विश्वचषक, आशिया चषक किंवा चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धांमधील खेळ पाहा; संघाने अत्यंत दर्जाहीन क्रिकेट खेळले आहे. पीसीबीने सातत्याने सहकार्य केले, अनेक प्रशिक्षक आले आणि गेले, पण खेळाडूंनी मैदानावर काहीही करून दाखवले नाही.

### पीसीबीच्या निर्णयाचे समर्थन

इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत पाकिस्तानला पहिल्या दोन सामन्यांत लाजीरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. यानंतर पीसीबीने तिसऱ्या कसोटीपूर्वी मोहम्मद रिझवान, इमाम-उल-हक, सलमान अली आगा, अली उस्मान, खुर्रम शहजाद, आमीर जमाल आणि मुहम्मद अवैस जफर या सात खेळाडूंना थेट मायदेशी पाठवले तसेच मुख्य प्रशिक्षक सरफराज अहमद आणि सहाय्यक प्रशिक्षक उमर गुल यांची हकालपट्टी केली. या अत्यंत कठोर पावलावर बोलताना युसूफ म्हणाले, पीसीबीने मालिकेच्या मध्यावर घेतलेल्या या निर्णयावर मला कोणतीही अडचण दिसत नाही. जागतिक कसोटी अजिंक्यपद क्रमवारीत पाकिस्तान नवव्या स्थानावर आहे, कारण त्या टेबलमध्ये केवळ नऊ संघच आहेत. जगभरात देशाचे नाव खराब होत असताना क्रिकेट बोर्डाने अशी कडक कारवाई करणे योग्यच आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com